cmyk

## संपादकीय

### केवळ संकेत घोषणा नाहीच !

शिवसेनेच्या स्थापना दिनी दोन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांनी परस्परांवर तीव्र हल्ला केला. ठाकरेंचा पूर्वाश्रमीचा आणि एकनाथ शिंदेंचा विद्यमान मित्र पक्ष असलेली भारतीय जनता पार्टीही दोघांच्या निशाण्यावर होती. फरक एवढाच की उद्धव यांनी मालक आणि नौकर, शेठजी आदी शब्द वापरत थेट निशाणा साधला, तर शिंदेंना तसे करण्यास मर्यादा आली. तथापि, या दोन्ही गटांच्या अर्थात पक्षांच्या मेळाव्यात एका गोष्टीची स्पष्टता होण्याची राज्यातील असंख्य कार्यकर्ते आणि मतदार वाट पाहत होते. त्यासंदर्भात पुन्हा केवळ संकेतच मिळाले. थेट घोषणा झालीच नाही.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### लोकसभा निवडणुकीत भाजपकडून सर्वाधिक १४९४ कोटी खर्च!

नवी दिल्ली । वृत्तसेवा

२०२४ च्या लोकसभा आणि त्याचबरोबर झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये सर्वात जास्त खर्च भारतीय जनता पक्षाने केला असून, एकूण १४९४ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. हे एकूण निवडणूक खर्चाच्या ४४.५६ टक्के आहे. काँग्रेसने ६२० कोटी रुपये खर्च केले. काँग्रेस पक्ष दुसऱ्या स्थानी आहे. त्यांनी एकूण खर्चाच्या १८.५ टक्के खर्च केला. आहे. एसोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स यांनी प्रसिद्ध केलेल्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. या अहवालात एकूण ३२ राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांच्या खर्चाचा अभ्यास करण्यात आला.

बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–५९ रविवार, दि.२२ जुन २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### क्रिकेटपटू तुषार देशपांडेने घेतले खंडोबाचे दर्शन

जेजुरी–भारतीय क्रिकेटपटू आयपीएलमधील राजस्थान रॉयल्स संघाचा खेळाडू तुषार देशपांडेने खंडोबा देवाचे दर्शन घेतले आहे. यावेळी श्री.मार्तंड देवसंस्थानच्या वतीने विश्वस्त मंगेश घोणे आणि विश्वास पानसे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

### सरपंचाला १० हजारांची लाच घेताना पकडलं

बीड– माजलगाव तालुक्यातील किट्टी आडगाव येथील सरपंच रूखमान्द खेत्रे याने रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून विहिरीच्या अंतिम यादीत नाव देण्यासाठी २० हजार रुपयांची फिर्यादीला लाच मागितली होती. यातील १०,००० रुपयांची लाच स्वीकारताना आज दुपारी लाचलुचपत विभागाने रंगेहात पकडले असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

### अमित शहा कधीच खोट बोलत नाहीत– योगेश कदम

मुंबई–जगात हिंदुत्वाचा झेंडा भाजपा फडकवत आहे, त्यांना आम्ही साथ देतोय असे मंत्री योगेश कदम यांनी म्हटले आहे. शिवसेना हा हिंदुत्ववादी पक्ष असल्याचा संजय राऊत आणि त्यांच्या नेत्यांना विसर पडल्याने नुकसान झाले. अमित शहा कधीच खोट बोलत नाहीत अशी त्यांची छबी आहे. अमित शहा आणि नरेंद मोदी हे दोघेही बाळासाहेबांचा सन्मान राखतात असेही कदम यांनी म्हटले आहे.

### महाबळेश्वरचा वेण्णा लेक ओव्हरफ्लो

महाबळेश्वर–यंदा महाबळेश्वरमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे महाबळेश्वरचा वेण्णा लेक जून महिन्यातचओव्हरफ्लो झाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे महाबळेश्वर आणि पाचगणीचा पाणीप्रश्न मिटला आहे.

### गंगापूर धरणातील पाण्याचा विसर्ग वाढला

नाशिक–गंगापूर धरणातील पाण्याचा विसर्ग वाढल्याने गोदा घाट परिसरातील पाणीपातळीत वाढ झालेली पाहायला मिळाली. दितोंड्या मारुतीच्या गुडघ्यापर्यंत पाणी पोहोचल्याचे सध्याचे चित्र आहे.

### शाहरुखच्या मन्नत बंगल्याच्या विरोधात तक्रार

मुंबई–मन्नत बंगल्याच्या नूतनीकरणादरम्यान सीआरझेड नियमांचे उल्लंघन केले जात असल्याची तक्रार करण्यात आली आहे. बीएमसीच्या पथकाने आणि वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी काल मन्नत बंगल्यात पाहणी केली. शाहरुख खान यांच्या बंगला बांद्रा चौपाटी येथे आहे. सध्या काम सुरू आहे. पालिका आणि वन विभाग अधिकाऱ्यांनी येथे येऊन पाहणी केलेली आहे.

### एसटीच्या या इलेक्ट्रिक गाडीमध्ये दिव्यांगांना नो एंट्री

मुंबई–शिवाई एसटी बसमध्ये दिव्यांगासाठी राखीव सीट आहे. मात्र तिकीट मशीनमध्ये इन्स्टॉलेशन नसल्यामुळे दिव्यांगांना डावलण्यात आल्याचे समोर आले आहे. महाराष्ट्रामध्ये पाच हजार इलेक्ट्रिक गाड्या दाखल होणार आहेत त्यामध्ये तरी दिव्यांगांना बसण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी दिव्यांकांकडून केली जात आहे.

### श्री संत गजानन महाराज पालखी अंबाजोगाईत

आंबाजोगाई–श्री संत गजानन महाराज पालखीचे परळीत दोन दिवसाच्या मुक्कामी होती. त्यानंतर आता पालखी अंबाजोगाईकडे रवाना झाली. शनिवारी सकाळी पालखी अंबाजोगाईकडे रवाना झाली आहे. दोन जून रोजी पालखीचे प्रस्थान शेवगाव येथून झाले होते.

### योग विद्या आपली प्राचीन संस्कृती – देवेंद्र फडणवीस

मुंबई–योग विद्या आपली प्राचीन संस्कृती असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. पुण्यात झालेला भक्तीयोगाचा कार्यक्रम अतिशय आनंद देणारा आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त त्यांनी भावना व्यक्त केल्या.

### उद्धव–राज ठाकरे दोनच समविचारी नेते– संजय राऊत

मुंबई–राज्यात दोनच समविचारी पक्ष असून उद्धव आणि राज ठाकरे दोनच समविचारी नेते असल्याचे खासदार संजय राऊत यांनी मोठे वक्तव्य केले आहे. उद्धव–राज यांच्यातल्या संवादावरून भूमिका ठरतील, तेव्हा महाराष्ट्राची गरज म्हणून काँग्रेससोबत गेलो, आता मराठी माणसाची एकजूट राहावी, ही ठाकरेंची भूमिका असल्याचे ते म्हणाले.

# शेतकऱ्यांना योग्य वेळी कर्जमाफी देणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केली भुमिका



**पुणे । प्रतिनिधी**

**सरकार शब्द फिरवणार नाही. योग्य वेळी कर्जमाफीचा निर्णय होईल. कर्जमाफी कधी करायची या संदर्भात काही नियम आहेत, पद्धती आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. योग दिनाच्या कार्यक्रमानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.**

राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात यावी यासाठी काही दिवसापुर्वीच प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांनी उपोषण केले होते. यावेळी उपोषण सोडताना मंत्री चंद्रशेखर बावन्नकुळे, मंत्री उदय सामंत यांनी मुख्यमंत्र्यांच्या वतीने बच्चू कडू यांना शेतकरी कर्जमाफी संदर्भात आश्वासन दिले होते. त्यानंतरच कडू यांनी आंदोलन मागे घेतले. त्यानंतर बच्चू कडू यांना राज्य सरकारने गाजर दाखवल्याची जोरदार चर्चा होती. त्यामुळे सरकार खरच शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार का? याविषयी शेतकऱ्यांमध्ये सुध्दा संभ्रम निर्माण झाला होता. आता स्वत: देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी कर्जमाफी संदर्भात आपली भुमिका स्पष्ट केली आहे. पत्रकारांशी बोलताना फडणवीस म्हणाले, शेतकरी कर्जमाफीचा निर्णय योग्यवेळी घेऊ, सोबतच जनतेला दिलेला एकही शब्द आपण फिरवणार नसल्याची ग्वाही त्यांनी दिली. मी कर्जमाफी बाबत सविस्तर मी सांगितले आहे, कर्जमाफी कधी करायचे यासंदर्भात त्याचे काही नियम आहेत. कर्जमाफीची एक पद्धत आहे, या सरकारनं दिलेला एकही शब्द फिरवत नाही, उचित वेळी योग्य वेळी हा निर्णय घेतला जाईल.

### ती योग्य वेळ कधी येणार?

राज्यातील शेतकऱ्यांवर सध्या वाईट दिवस आलेले आहेत. शेतमालाला चांगला भाव मिळत नाही, कधी निसर्गाचा लहरीपणा शेतकऱ्याला उध्वस्त करीत आहे. मुलींचे लग्न करणे सुध्दा शेतकऱ्यांच्या हाताबाहेर गेले आहे. त्यामुळे शेतकरी कर्जमाफी आवश्यक असून जरी कर्जमाफी योग्य वेळी केली जाईल असे फडणवीसांनी सांगितले असले तरी ती योग्य वेळ कधी येणार हे मात्र सांगितले नाही.

### धरणातील पाण्यासह पावसाच्या पाण्यावर लक्ष

राज्यातील धरणातील पाण्याबाबत आणि पावसाच्या पाण्याबाबत आम्ही लक्ष ठेवून आहोत. कधी पाण्याचा विसर्ग करायचा कधी कमी करायचा, बाजूच्या राज्यांमध्ये आमचे बोलणे सुरू आहे. योग्य बोलणं सुरू आहे, असे फडणवीस म्हणाले.

### आता तिकीट कन्फर्म होणार की नाही, हे कळणार

मुंबई । प्रतिनिधी

रेल्वेच्या तिकीट बुकींगची मर्यादा निश्चित केली जाणार आहे. एकूण तिकीटांच्या केवळ २५ टक्के तिकीटांनाच वेटिंगसाठी ठेवले जाणार आहे. त्यामुळे आता तिकीट कन्फर्म होणार की नाही, प्रवास करायचा की नाही या अनिश्चिततून प्रवाशांची सुटका होणार आहे.

**रेल्वेच्या एकूण तिकीटांच्या २५ टक्के तिकीटांनाच वेटिंग**

तिकीटांना मर्यादीत वेटींग दिल्याने तिकीट कन्फर्म होण्याची शक्यता अधिक असणार आहे. रेल्वेच्या नव्या नियमानुसार फर्स्ट क्लास, सेकेंड आणि थर्ड, स्लीपर आणि चेअर कार– अशा प्रत्येक श्रेणीत एकूण सीटच्या कमाल २५ टक्के हिस्सा वेटिंग तिकीटाच्या स्वरुपात बुक केला जाऊ देणार आहे. म्हणजे एखाद्या ट्रेनमध्ये जर ८०० सीट असतील तर केवळ २०० तिकीटच वेटींगमध्ये जातील त्यानंतर त्या क्लासाची तिकीट बुक होणार नाही.

# शरद पवारांना सोडणं आयुष्यातील खूप मोठी चूक

## शिवसेना नेते भास्कर जाधव यांनी व्यक्त केली खंत





**मुंबई । प्रतिनिधी**

**शरद पवार यांना सोडून शिवसेनेत आलो ही सर्वात मोठी चूक होती, आता त्याचे परिणाम भोगावे लागत असतील अशी कबुली शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी एका वृत्त वाहिनीच्या कार्यक्रमात दिली आहे.**

राज्यात महाविकास आघाडीचे २०१९ मध्ये सरकार आल्यावर भास्कर जाधव यांना मंत्रीपद देण्यात आले नाही. पवारांची साथ सोडल्यामुळे पवारांनी भास्कर जाधव यांना मंत्रीपद मिळू दिले नाही का? आजवरचा इतिहास आहे की पवारांना जे सोडून गेले त्यांना भविष्यात कोणतेही पद मिळाले नाही. या प्रश्नावर उत्तर देताना भास्कर जाधव म्हणाले, शरद पवार हा मोठ्या मनाचा माणूस आहे. त्यांनी माझ्या मंत्रीपदाला विरोध केला असेल असे मला वाटत नाही. पण त्यांनी जर केले असेल तर ते बरोबर केले आहे. पवार साहेबांना सोडून शिवसेनेत दाखल होणे ही माझी आयुष्यातील सर्वात मोठी चूक होती अशी कबुली जाधव यांनी दिली.

पवारांनी माझ्या ◀◀ पान २ वर

### पवारांना अनेकांनी सोडले पण माझ्यावर प्रयोग

जाधव म्हणाले, मी अध्यक्ष असताना पवार साहेबांना गंमतीने विचाराचो. सगळे तुम्हांला सोडून जात आहेत. तुम्ही सर्वांना माफ का करतात. त्यांना धडा का शिकवत नाही. त्यावर पवार हसायचे. मला कदाचित वाटतं पवार साहेबांनी पहिला प्रयोग माझ्यावर केला असेल, असे ते म्हणाले.

# पकडला दुचाकी चोरीत, निघाला अट्टल दरोडेखोर



**स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी**

बीड । प्रतिनिधी

मोटर सायकल चोरीच्या प्रकरणांमध्ये एका आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने पकडल्यानंतर तो अट्टल दरोडेखोर असल्याचे उघड झाले आहे. यावेळी अटक करण्यात आलेल्या आरोपीकडून पाच मोटरसायकल जप्त करण्यात आल्या.

दिनांक २० जून रोजी महादेव भगवान दळवे, (वय ५४ वर्ष, रा बालेपीर बीड) यांनी पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे फिर्याद दिली की, त्याचे राहते घरासमोरुन दुचाकी कोणीतरी ◀◀ पान २ वर

# निवडणुकीचे फुटेज ४५ दिवसांत नष्ट करा

## केंद्रीय निवडणुक आयोगाचे राज्य निवडणुक आयोगाला आदेश



नवी दिल्ली । वृत्तसेवा

निवडणुकीचे फुटेज आता ४५ दिवसांत नष्ट केले जाणार आहे. याबाबत राज्य निवडणुक आयोगाला केंद्रीय निवडणुक आयोगाने आदेश दिले आहेत. आता यावर विरोधकांकडून काय भुमिका घेतली जाईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मतदान ◀◀ पान २ वर

# आरोग्य जीवनासाठी योगसाधना करावी

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे आवाहन



बीड । प्रतिनिधी

आरोग्यदायी जेवणासाठी योगा साधना महत्त्वाचे आहे नागरिक सर्व नागरिकांनी योगा साधना करून आरोग्यदायी जीवन जगव्याचे आव्हान बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज संकुल सभागृहात दि. २१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. योग दिनाच्या शिबिराचे उद्घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी बोलत होते याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आदी मान्यवरांचे उपस्थिती होती. याप्रसंगी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जीवनातील योगाचे महत्त्व विशद करून आरोग्यदायी जीवनासाठी योगाने व्यायामाचे महत्त्व विशद केले. ◀◀ पान २ वर

# पाकिस्तानची उपासमार होईल–अमित शहा

नवी दिल्ली । वृत्तसेवा

केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी पाकिस्तानबाबत भारताने घेतलेल्या कडक भूमिकेची पुनरुच्चार करत स्पष्ट केले की, 'इंडस वॉटर ट्रीटी' आता पुन्हा कधीच बहाल केला जाणार नाही. ''पाकिस्तानला आता पाणी देण्यात येणार नाही, त्यांना उपासमारीसारखी स्थिती ओढवेल,'' असे तीव्र शब्दांत शहा यांनी स्पष्ट केले.

२२ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पाहलगाममध्ये झालेल्या ◀◀ पान २ वर

# राष्ट्रीय महामार्गातील दोन टप्प्यांसाठी ४२१ कोटींची कामे मंजूर

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिले खा. सोनवणेंच्या पाठपुराव्याला पाठबळ



बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातून अनेक राष्ट्रीय महामार्ग गेले असून वाहतुकीच्या दृष्टीने माजलगाव ते केजमधील धारूर जवळचा घाट ब्लॅकस्पॉट ठरला होता. शिवाय लातूर ते लोखंडीसावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव रस्त्यातील उर्वरित लांबीचे चौपदरीकरण करण्याची बाबही महत्वाची होती. याबाबत खा.बजरंग सोनवणे यांनी वारंवार पाठपुरावा केला आणि या पाठपुराव्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पाठबळ देत ४२१ कोटींची ही दोन्ही कामे सन २५–२६ च्या वार्षिक नियोजनामधे मंजुरीस प्रस्तावित केली आहेत.

राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८(सी) माजलगाव ते केजमधील धारुर जवळच्या घाट अरुंद असून चढ जास्त असल्यामुळे वारंवार अपघात होत होते, तसेच प्रवासात वेळ लागत होता. हा घाट ब्लॅकस्पॉट म्हणूनही जाहिर करण्यात आलेला आहे. ही बाब विचारात घेऊन बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी धारुर घाटातील रस्त्याला पर्यायी मार्ग म्हणून थेटेगव्हाण मार्गे कमी चढाईचा व अधिक रुंदीचा चौपदरी रस्ता करण्यासाठी जुलै २४ पासून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचेकडे व रस्ते वाहतूक ◀◀ पान २ वर

### या कामांसाठीही सुरू आहेत प्रयत्न

अहमदपूर ते पिंपळा धायगुडा, धायगुडा पिंपळा ते लोखंडी सावरगाव व लोखंडी सावरगाव ते मांजरसुंबा या रस्त्यांचे चौपदरीकरणाचे प्रस्ताव समितीकडून मंजुरी करुन घेऊन त्या कामांनाही प्राधान्याने मंजुरी घेण्यात येईल, असे खासदार सोनवणे यांनी म्हटले आहे.

### दोन्ही कामाच्या निविदा लवकरच

मंजुरी देण्यात आलेल्या दोन्ही कामाच्या निविदा लवकरच होऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल. केंद्रीय रस्ते वाहतूक व दळणवळणमंत्री नितीन गडकरी यांचे मोलाचे सहकार्य लाभत असून त्याबद्दल मी जिल्ह्याच्या वतीने त्यांचे आभार मानतो, असे खासदार बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१९ जुन २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३७.५० क्विंटल | १,७४१ | २,६३० | २,३०५ |
| ज्वारी/हायब्रिड : ५८.०० क्विंटल | २,२०३ | २,८७४ | २,५६९ |
| मका/लोकल:२१.००क्विंटल | २,२०० | २,४०० | २,२६६ |
| तूर : ३०.०० क्विंटल | ६,०५० | ६,५६५ | ६,३१५ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ६,४४१ | ६,४४१ | ६,४४१ |
| बाजरी: २९.०० क्विंटल | १,८५१ | २,७०० | २,३४१ |
| मुग :१.०० क्विंटल | ५,००० | ६,२०० | ५,६०० |
| सोयाबीन:४८.५० क्विंटल | ४,२७५ | ४,३११ | ४,२९३ |
| हरभरा:२१.०० क्विंटल | ३,४०० | ५,४०० | ५,०८७ |

cmyk

## अग्रलेख

# केवळ संकेत घोषणा नाहीच !

शिवसेनेच्या स्थापना दिनी दोन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांनी परस्परांवर तीव्र हल्ला केला. ठाकरेंचा पूर्वाश्रमीचा आणि एकनाथ शिंदेंचा विद्यमान मित्र पक्ष असलेली भारतीय जनता पार्टीही दोघांच्या निशाण्यावर होती. फरक एवढाच की उद्धव यांनी मालक आणि नौकर, शेठजी आदी शब्द वापरत थेट निशाणा साधला, तर शिंदेंना तसे करण्यास मर्यादा आली. तथापि, या दोन्ही गटांच्या अर्थात पक्षांच्या मेळाव्यात एका गोष्टीची स्पष्टता होण्याची राज्यातील असंख्य कार्यकर्ते आणि मतदार वाट पाहत होते. त्यासंदर्भात पुन्हा केवळ संकेतच मिळाले. थेट घोषणा झालीच नाही. हा विषय होता मनसेचा आणि त्या पक्षाचे प्रमुख राज ठाकरे यांचा. पेपर चांगला गेला असे म्हणायचे आणि अवघड प्रश्न सोडवलाच नाही अशी ही स्थिती आहे व तिच्यावर लवकरात लवकर निकाल लागणे अपेक्षित असताना दिवसेंदिवस अधिकच क्लिष्टता निर्माण होत असल्याचे दिसते आहे.

उद्धव आणि राज हे दोघे भावंडे असली, तरी त्यांचे मित्र मात्र वेगळे आहेत. आजचा राजकीय पट पाहता एकत्र येणे एकवेळ या भावांना शक्य करून दाखवता येईल. तथापि, मित्रांना ते मान्य होणार नाही आणि त्यावरच राज्यातील राजकारण कदाचित आणखी काही काळ कोणतेही निर्णायक वळण घेऊ शकणार नाही. मुख्यमंत्रिपदावरून भारतीय जनता पार्टीशी मोहभंग झाल्यामुळे उद्धव ठाकरे गेले ते थेट दोन्ही काँग्रेसच्या तंबूत. शरद पवारांच्या राष्ट्रवादीशी ठाकरेंचे आणि त्यांच्या शिवसेनेचे राजकीय मतभेद आणि वैर असले तरी खासगीत चांगले सलोख्याचे किंबहुना घट्ट संबंध होते. राजकारणात खासगीतील संबंधांना थारा नसतो. जनतेतील तुमची प्रतिमा आणि विचारधारा याच्याशी बांधील राहावे लागते. त्यामुळेच शिवसेनाप्रमुखांच्या हयातीत संपूर्ण काँग्रेस एकसंध असताना आणि विभागल्यावरही बाळासाहेबांनी राजकारणात या दोन्ही पक्षांचे पथ्यच पाळले. तो पायंडा उद्धव ठाकरेंनी मोडला आणि चुकीचा निर्णय घेतला त्याचे कारण या दोन पक्षांपेक्षा भारतीय जनता पार्टी उजवी आणि चांगली आहे अथवा होती असे नाही, तर शिवसेनेची आणि भाजपची विचारधारा सारखी होती व बाळासाहेबांनी त्याचाच पुरस्कार केला. दोन्ही काँग्रेसची विचारधारा शिवसेनेला आणि शिवसैनिकांना कधीच जवळची वाटली नाही, कारण त्यांना बाळासाहेबांनी ज्याप्रकारे घडवले होते त्याच्या अगदी उलटा प्रवास उद्धव ठाकरेंनी केला. राज ठाकरेही मूळचे शिवसेनेचे आणि ठाकरे कुटुंबातील. त्यांची विचारधाराही बाळासाहेबांनी त्यांना जे शिकवले आणि त्यांच्याकडून राज यांनी जे आत्मसात केले तीच. विचारधारेच्या संदर्भातूनच विचार करायचा झाला तर आज राज यांना भाजप आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना अधिक जवळची वाटणे स्वाभाविक आहे. त्यांच्या सैनिकांनाही फार मोठे वळण घ्यावे लागणार नाही व ते चटकन रूळतील. याउलट उद्धव ठाकरेंसोबत गेले तर मनसैनिकांची आणि राज यांचीही अडचण करणारे अनेक मुद्दे आहेत. ठाकरे हा सुप्रीम ब्रँड आहे हे निर्विवाद सत्य आहे. तो केवळ मुंबई, ठाणे, नाशिक पट्ट्यातच नाही तर कोकण, मराठवाडा आणि संपूर्ण महाराष्ट्रात चालणारा आहे. दोन्ही ठाकरे बंधूंनी एकत्र येण्याने गेल्या दहा वर्षांत राज्याच्या राजकारणात ज्या पडझडी झाल्या त्यातील किमान ६० ते ७० टक्के भरपाई होऊ शकते. ते एक झाले तर सत्तेत असोत वा नसोत राज्यात एक शक्तीसंतुलन निश्चितच साधले जाणार आहे. पूर्वी काँग्रेस पक्ष सगळ्यांत मोठा पक्ष असल्यामुळे बाळासाहेबांच्या निशाण्यावर असायचा, आता भाजप त्या जागी असेल आणि मतदार मोठ्या संख्येने ठाकरेंच्या मागे असतील ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. त्या स्थितीत काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्ष यांची फारशी गणना होणार नाही. काही काळाने किंवा कदाचित आताच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर शिंदेंच्या सेनेची तीच अवस्था होऊ शकते. सत्तेची ऊब असते तोपर्यंत नेते टिकवता येतात आणि बांधून ठेवता येतात, सत्ता गेली की केव्हा घर रिकामे होते याचा अनुभव आज काँग्रेस घेते आहे. दोघे भाऊ एकत्र आले तर काय होऊ शकते याची उद्धव यांच्या विद्यमान मित्रांना आणि राज यांच्याही मित्रांना चांगली कल्पना असल्यामुळे भावांनी एकत्र न येण्याच्या क्लृप्त्या त्यांच्याकडून लढवल्या जात आहेत. उद्धव-राज एकत्र आले तर राज यांच्या सभांना होणारी गर्दी मतांचा लाभ करून देऊ शकत नाही अशी भीती खुद्द पवारांकडूनच उद्धव यांना घातली जाते आहे. तर राज त्यांच्या भावासोबत गेले तर ज्या मुंबईसाठी शिवसेनेला पंगू केले ती मुंबई हातापासून दूरच जात राहील याची भाजपला कल्पना आहे. त्यामुळेच भाजपच्या गोटातून राज यांना शक्य त्या प्रकाराने रोखण्याचे प्रयत्न राहतील. शिंदे आणि त्यांचे नेतेही याचसाठी कामाला लागले आहेत. राज यांना जुन्या कथित अपमानांची आठवण करून दिली जाते आहे. हा सगळा याच व्यापक कथानकाचा भाग आहे.

# तहसीलदारांचा वाळू माफियाला दणका २२ वाळू माफियांवर गुन्हे दाखल

अंबड । प्रतिनिधी

गोदावरी नदीपात्रातून वाळू उपसा करणारे २२ वाळू माफिया विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला सदरील धडाकेबाज कारवाई तहसीलदार विजय चव्हाण यांच्या आदेशावरून धडाकेबाज कारवाई करण्यात आली यामुळे वाळू माफियांची झोपा उडाल्या तर तहसीलदारांच्या भीतीमुळे काही वाळू माफिया गाव सोडून पळून गेले.तहसीलदार विजय चव्हाण यांच्या आदेशावरून अंबड तालुक्यातील गोंदी येथील सिद्धेश्वर पॉईंट गोदावरी नदीपात्रातून अवैध रित्या २५ लाख रुपये किमतीचा ५०० ब्रास वाळू उपसा व वाहतूक केल्या प्रकरणी गोंदी येर्थील २२ वाळू माफियावर गुन्हे दाखल करण्यात आले असून ही कारवाई तहसिलदार विजय चव्हाण यांच्या आदेशाने महसूल विभागाने रात्री उशीरा ही कारवाई करण्यात आली. तसेच अवैध वाळू उपसा करणाऱ्या मध्ये दोन तडीपार पण करण्यात आले.

वाळू माफियांचाही समावेश आहे. गोंदी येथील सिद्धेश्वर मंदिर परिसरातील गोदावरी नदी पात्राची अंबड तहसील गौण खनिज प्रतिबंधक पथकाने पाहणी केली या दरम्यान त्या ठिकाणी अवैध रित्या साठा केलेले वाळचे तीन ढिगारे आढळून आले अंदाजे ४० ते ५० ब्रास साठा हा आढळून आला तर नदीपात्रात मोठ मोठे खड्डे दिसून आले असून महसूल पथकावर पाळत ठेवून केनीच्या सहाय्याने सिद्धेश्वर मंदिर परिसरातील गोदावरी नदी पात्रातून ५०० ब्रास अवैध रित्या



वाळू उपसा केल्याचे दिसून आले. बाजार भावाप्रमाणे ५ हजार रुपये ब्रास प्रमाणे ५०० ब्रास वाळू असा २५ लाख रुपये किमतीची वाळू चोरून नेली असल्याचे समोर आले. सदर वाळू कोणी चोरली म्हणून त्या ठिकाणी महसूल पथकाने विचारपूस केली मात्र वाळू माफियाची त्या ठिकाणी दहशत असून गुंड प्रवृत्तीचे असल्यामुळे त्यांची नावे

सांगण्यास भीत असल्याने महसूल पथकाने गोपनीय खबऱ्या मार्फत माहिती विचारली असता गोंदी येथील २२ जणांनी केनीद्वारे अवैध रित्या वाळू उपसा केला आहे. यावरून पंचनामा करून गोंदीचे मंडळ अधिकारी कृष्णा सांडुजी एडके यांच्या फिर्यादीवरून किशोर प्रभू खराद, विकास सुरेश खराद, मनोज सुरेश खराद, ऋषीकेश विशंभर खराद, डिगांबर रघुनाथ शिंदे, अजिनाथ दत्ता शिदे, अक्षय राजाभाऊ बाणाईत, सोपान दिनकर खराद, राहुल बळीराम खराद, बाबा अर्जुनराव कुर्लेकर, स्वप्नील तात्या निरकड, अवधूत दत्ता मिटकुल, गणेश कैलास मिरकड, महेंद्र कचरू खराद, आण्णासाहेब संजय सोळुंके, कचरू उत्तम खराद, दत्ता रघुनाथ शिंदे, महावीर उत्तम खराद, दुर्गादास आसाराम विटोरे, पंकज सखाराम सोळंके, सुयोग मधुकर सोळुंके , गजू उर्फ गजानन गणपत सोळुंके सर्व रा. गोंदी ता. अंबड यांच्या विरुद्ध भा.न्या.स. कलम ३०३ (२), ३(५) तह महाराष्ट्र जर्नीन महसूल अधिनीयम १९६६ कलम ४८ (७), ४८(८) सह गौण खनिज प्रतिबंधक कायदा कलम ३ व ४ प्रमाणे गोंदी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# दूध उत्पादक शेतकरी मार्गदर्शन कार्यशाळेस आमदार सुरेश धस यांची उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ मर्यादित आष्टी यांच्या वतीने मोरेश्वर मंगल कार्यालय आष्टी येथे दूध उत्पादक शेतकरी चर्चासत्र व मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत डॉ.जालिंदर वांढरे, डॉ. संतोष गवारे, डॉ. मंगेश ढेरे डॉ. बाबासाहेब कुंभार, डॉक्टर संदीप शिंदे, डॉ. धनंजय राजगुडे डॉ. शशिकांत कारखेले या पशुवैद्यकीय डॉक्टर व पशुधन विकास अधिकाऱ्यांनी दूध उत्पादक शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. यामध्ये विविध सत्रांमध्ये खालील विषयावर मार्गदर्शन




झाले. या कार्यशाळेमध्ये दुधाळ गाईची निवड करणे, पशु आहार व्यवस्थापन करणे, जनावरांचे घरगुती प्राथमिक उपचार व आयुर्वेदिक उपचार करणे, वंध्यत्व निवारण व दुबार ए.आय. करण्याचे कारणे व उपाययोजना, वंशावळ सुधारणा कृत्रिम रेतन व स्वार्टेड सिमेंन्सवर मार्गदर्शन झाले. यावेळी शेतकऱ्यांशी बोलताना दुध व्यवसायातील अनेक महत्वाच्या गोष्टी आणि व्यवसायाच्या अनुषंगाने विविध अनुभव सर्वांसमोर मांडले आहेत. यावेळी तालुका दूध संघाचे चेअरमन शांतीलाल भोसले, कार्यकारी संचालक मच्छिंद्र धनवडे सर्व संचालक मंडळ तालुक्यातील सर्व छोटे मोठे व मध्यम दूध उत्पादक शेतकरी दूध संकलन करणारे चेअरमन महिला दूध उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बिहारमध्ये मासिक पेन्शन ४०० रुपयांवरून १,१०० रुपये

पाटणा । वृत्तसंस्था

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी राज्यातील विधानसभा निवडणुकीपूर्वी मोठा मास्टर स्ट्रोक खेळला आहे आणि वृद्ध, अपंग आणि विधवा महिलांना देण्यात येणारे मासिक पेन्शन वाढवण्याची घोषणा केली आहे.

नितीश कुमार यांनी मासिक पेन्शन ४०० रुपयांवरून १,१०० रुपये करण्याची घोषणा केली. हा निर्णय जुलैपासून लागू होईल. या निर्णयाचा फायदा राज्याच्या सामाजिक सुरक्षा पेन्शन योजनेअंतर्गत एक कोटी नऊ लाख ६९ हजार २५५ लाभार्थ्यांना होईल. मासिक पेन्शनमध्ये वाढ जाहीर करताना नितीश कुमार म्हणाले, सामाजिक सुरक्षा पेन्शन योजनेअंतर्गत, आता सर्व वृद्ध, दिव्यांग आणि विधवा महिलांना दरमहा ४०० रुपयांऐवजी जुलै महिन्यापासून ११०० रुपये पेन्शन मिळेल. ही रक्कम महिन्याच्या १० तारखेला सर्व लाभार्थ्यांच्या खात्यात पाठवली जाईल. याची खात्री केली जाईल. वृद्ध हे समाजाचा एक मौल्यवान भाग आहेत आणि त्यांना सन्माननीय जीवन मिळवून देणे हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. राज्य सरकार या दिशेने आपले प्रयत्न सुरू ठेवेल. या वर्षी बिहारमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीची तयारी सर्व राजकीय पक्षांनी सुरू केली आहे.

# ४० कोटीचा घोटाळा अपहारप्रकरणी २१ अधिकारी निलंबित!

## नियमाप्रमाणे कारवाई सुरू आहे जिल्हाधिकारी

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात शेतकर्यांच्या पीक नुकसानीपोटी मिळणार्या ४० कोटी रुपयांच्या निधीमध्ये अपहार केल्याप्रकरणी २१ सरकारी अधिकार्यांना निलंबित करण्यात आले आहे. हा निधी दुष्काळ आणि अतिवृष्टीसारख्या नैसर्गिक आपत्तींनी बाधित शेतकर्यांसाठी होता.

जिल्हाधिकार्यांनी नियुक्त केलेल्या एका समितीने केलेल्या चौकशीत, २०२२ ते २०२४ या कालावधीत शेतकर्यांच्या मदतीसाठी वितरित केलेल्या सुमारे ४० कोटी रुपयांच्या गैरवापरात ८९ सरकारी कर्मचारी दोषी आढळले आहेत. यात तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहायक यांचा समावेश आहे.

जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी आतापर्यंत २१ अधिकार्यांना निलंबित केले असल्याची माहिती जिल्हाधिकारी श्री कृष्ण पंचाळ यांनी बोलताना आमचे प्रतिनिधी शिवाजी मस्के यांना दिली. तसेच ते म्हणाले की शासन नियमाप्रमाणे कारवाई सुरू आहे कोणाच्याही सांगण्यावरून बेकायदेशीर कारवाई करण्यात येणार नाही सदरील कारवाई नियमाप्रमाणे सुरू आहे कोणालाही काही शंका असल्यास त्यांनी न्यायालयामध्ये जावे असे पण बोलल्या जात आहे. गेल्या आठवड्यात १० तलाठ्यांना निलंबित करण्यात आले होते, तर गुरुवारी आणखी ११ अधिकार्यांना निलंबित करण्यात आले, ज्यात सात तलाठी आणि चार सहायक महसूल अधिकार्यांचा समावेश आहे.

या घोटाळ्यामध्ये महसूल कर्मचार्यांसाठी असलेल्या लॉगिन क्रेडेंशियलचा (प्रवेश



ओळखपत्र) गैरवापर करून यंत्रणेत फेरफार करण्यात आल्याचे तपासातून समोर आले आहे. शेतकर्यांच्या तक्रारीनंतर सुरू झालेल्या या चौकशीत बनावट दावे, लाभार्थींच्या नावांची दुप्पट नोंदणी आणि जमिनीची मालकी नसलेल्या व्यक्तींनाही भरपाई वाटप झाल्याचे उघड झाले आहे. समितीच्या अहवालात या आर्थिक अनियमिततांना दुजोरा मिळाला आहे.

याशिवाय, ३५ इतर तलाठ्यांवरही खातेनिहाय कारवाई सुरू करण्यात आली आहे. या अहवालात पाच तहसीलदार आणि सहा नायब तहसीलदारांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात आली असून, त्यांना लेखी खुलासा देण्यास सांगितले आहे. पण या प्रकरणी तहसीलदार व नायब यांचा काहीच संबंध नाही असे पण काही तज्ञ महसूल सेवेतील सेवानिवृत्त अधिकाऱ्याकडून बोलल्या जात आहे.हे प्रकरण आता राज्य सरकारकडे पाठवण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी पांचाळ यांनी सांगितले की, नोटिसांना समाधानकारक प्रतिसाद न देणार्या अधिकार्यांवर यापूर्वीच कारवाई करण्यात आली असून, इतरांची चौकशी सुरू आहे. ते पुढे म्हणाले की, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पीक नुकसानीच्या भरपाईच्या निधीचा गैरवापर करणार्या दोषींवर तपास पूर्ण झाल्यावर एफआयआर दाखल केले जातील. तसेच या प्रकरणी ज्या कोणत्या शेतकऱ्यांना लाभ मिळाला त्यांचे पण नाव समोर येणे गरजेचे आहे असे पण काही तज्ञ सेवानिवृत्त महसूल विभागाच्या अधिकाऱ्याकडून बोलल्या जात आहे.

## पान ६ वरून...

### छत्रपती शिवाजी विद्यालयात

पाटील, फरजाना पठाण, स्मिता डाके,शिल्पा शिनगारे,शेख इशरत,मंजुषा गाजरे,तुळशीराम साळवे,पंकज कळसकर,ज्ञानेश्वर पवार,शेख शहाणूर, रवीकुमार साळवे, कैलास कदम , प्रथमेश लांडगे, दिनकर काळे,दत्ता पांडे यांच्यासह सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### टाळ मृदुंग गजराच्या

चोख असा बंदोबस्त ठेवला होता. त्यामुळे पालखीस पालखिमार्गावर कोणताही अडथळा तथा अडचण निर्माण झाली नाही. आरोग्य विभागाच्या वतीने देखील वारकऱ्यांच्या साठी आरोग्य आपल्या दारी हा उपक्रम राबविण्यात येऊन वारकऱ्यांच्या आरोग्यासाठी त्यांनी तत्परता दाखवल्याचे दिसून आले. संत गजानन महाराज पालखीच्या मार्गावर विविध गावांमध्ये शहरांमध्ये ठिकठिकाणी संत गजानन महाराज पालखीचे उत्स्फूर्तपणे स्वागत आणि पूजा केली जात होती. पालखीचे हे ५६ वे वर्ष असून पालखीत शेगाव येथून जवळपास ६०० ते ७०० वारकरी सहभागी झाले आहेत. यात काही टाळकरी तर काहींच्या हाती भगव्या पताका आहेत. हा संत गजानन महाराज पालखी सोहळा हा अत्यंत शिस्तबद्ध व विशिष्ट अशा चौकटीत मार्गक्रमण करणारा म्हणून ओळखला जातो. अंबाजोगाई शहरातील संत भगवान बाबा चौकातून अण्णाभाऊ साठे चौक मार्गे खडकपुरा , कुत्तर विहीर मंडी बाजार मार्गे श्री योगेश्वरी मंदिर परिसरात वारकऱ्यांच्या स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली असून तेथून पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात मुक्कामासाठी थांबणार आहे. श्री संत गजानन महाराज पालखीचा मुक्काम अंबाजोगाई शहरातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या प्रांगणात होणार असून रात्री भजन कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. दिनांक २२ रोजी रविवारी सकाळी ८.०० वाजता संत गजानन महाराज यांच्या पालखीचे पंढरपूरसाठी अंबाजोगाई शहरातून प्रस्थान होईल.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

माझी होणारी बायको आहेस असे म्हणुन तिचे सोबत बळजबरीने शारिरीक संबंध ठेवले. तसेच दि. २८/०८/२०२० रोजी फिर्यादीची आई बॅकेत गेली असता आरोपी पुन्हा फिर्यादीचे घरी आला व जबरदस्तीने तिचे सोबत शारिरीक संबंध ठेवले. त्यानंतर आरोपीने फिर्यादीशी बोलणे बंद केले. तरी, आरोपी रा. पाली ता. जि. बीड याने फिर्यादीशी फोनवर, व्हाटसअप, इंस्टाग्रामवर बोलून फिर्यादीशी जवळीकता निर्माण करून तिला लग्नाचे आमिष दाखवून तिची इच्छा नसतांना बळजबरीने तिच्याशी शारिरीक संबंध केले. अशा आशयाच्या फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे आरोपी विरूध्द कलम

३७६ (२) (जे) (एन) भादवी आणि कलम ४,६ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला. सदर फिर्यादीवरुन तात्कालीन पोलीस उपनिरीक्षक एम.बी. तुपे यांनी या प्रकरणाचा तपास केला व जिल्हा व सत्र न्यायालय तथा विशेष न्यायालय, बीड येथे आरोपी विरूद्ध दोषारोपपत्र दाखल केले.सदर प्रकरणाची सुनावनी मा. एस.आर शिंदे मॅडम अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश २ तथा विशेष न्यायाधिश बीड यांच्या न्यायालयात झाली. सदर आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकुण ०६ साक्षीदार तपासण्यात आले व सदर प्रकरणात पिडीता हिचा जबाब, वैद्यकिय पुरावा व कागदपत्रे यावरून व सहा. सरकारी वकिल अनिल बी. तिडके यांचा युक्तीवाद ग्राहय धरुन मा. एस. आर शिंदे मॅडम अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश २ तथा विशेष न्यायाधिश बीड यांनी आरोपी यास कलम ५ (एल), ६ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये दोषी ठरवत २० वर्ष सश्रम कारावास व १०,०००/- रूपये दंड आणि दंड न भरल्यास एक वर्षाचा सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. सदर प्रकरणात सहा. सरकारी वकिल अनिल बी. तिडके यांनी काम पाहिले त्यांना अजय दि. राख जिल्हा सरकारी वकिल तथा शासकीय अभियोक्ता बीड यांनी मार्गदर्शन केले तसेच पैरवी अधिकारी ५३९ सुरेश धोडिंराम जाधव व ए.एस.आय बिनवडे आणि पो.हे. कॉ बी.सी. निंबाळकर यांनी सहकार्य केले.

### आष्टी पंचायत समितीत

करून बदली करावी जेणेकरून गोरगरीब शेतकऱ्यांना न्याय मिळेल आणि त्यांचे प्रकरण मार्गी लागतील. जर कारवाई न केल्यास आपल्या पंचायत समिती कार्यालयासमोर आझाद क्रांती सेनेच्या वतीने तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा आझाद क्रांती सेनेचे तालुकाध्यक्ष संदीप वाल्हेकर यांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.या निवेदनाच्या प्रति जिल्हाधिकारी बीड, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी बीड यांना दिल्या आहेत.

### निरोगी मन व शरीरासाठी योगासन

आजार प्रवेश करत नाही म्हणून प्रत्येकाने नियमितपणे योगासने करावीत असे ते म्हणाले.अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड म्हणाले की, योगा हा आपल्या व्यक्तिमत्व विकासाचा महत्त्वाचा मार्ग आहे.आणि आपले व्यक्तिमत्व जर सुधारायचे असेल तर प्रत्येकाने वैयक्तिक आळस न करता नित्य नियमित योगाकडे वळले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनामध्ये पैशाला महत्त्व न देता आपल्या शारीरिक संपत्तीला महत्त्व दिले पाहिजे.तीच मोठी संपत्ती आजच्या जगात आहे असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले. याप्रसंगी डॉ. कमलकिशोर लड्डा, प्रा.सुरेशचंद्र नेळगे, डॉ. उमेश साडेगावकर यांनी सर्व शिक्षक कर्मचारी यांना योगा व प्राणायामाची प्रात्यक्षिके करून दाखवली.

## पान १ वरून...

### शरद पवारांना सोडणं

मंत्रीपदाला जर विरोध केला असेल तर त्यामागचे कारण सांगताना जाधव म्हणाले, मी शिवसेनेत होतो, त्यावेळी उमेदवारी मिळण्याची लायकी नसताना ज्या माणसाने मला राष्ट्रवादीत घेतले. राज्याचे सरचिटणीस केले. विधान परिषद मला दिली, निवडून आणले. विधानसभा दिली, निवडून आणले. मला मंत्रीमंडळात घेतले. मला पक्षाचा अध्यक्ष केले. त्या व्यक्तीने मी पक्ष सोडल्यावर माझ्या मंत्रीपदाला विरोध केला असेल. तर ते बरोबरच केले. शेवटी मला माझे प्राक्तन भोगले पाहिजे, असे ते म्हणाले.

### राष्ट्रीय महामार्गातील दोन टप्प्यांसाठी

व महामार्ग विभागाकडे सतत पाठपुरावा केला. सन २५/२६ चा कृति आराखडा व वार्षिक नियोजनात सदरील काम घेण्यात आले असून या ११ कि.मी रस्त्यासाठी तब्बल १७१ कोटी रुपये खर्च प्रस्तावित केला आहे. माजलगाव, वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांची शेतीमाल वाहतुक सुलभ होणार आहे. या सोबतच लातूर ते लोखंडीसावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव रस्ता या उर्वरित लांबीचे चौपदरीकरण करण्याची मागणी करण्यात आली होती. हे २५० कोटी रुपये अंदाजित किंमत असलेल्या १८ कि.मीचे काम सन २५-२६ च्या वार्षिक नियोजनामधे मंजुरीस प्रस्तावित करण्यात आले असून दोन्ही कामे करण्यास उच्च प्राधान्य देण्यात आलेले आहे.

### पकडला दुचाकी चोरीत

अज्ञात चोरटयांनी हॅन्डल लॉक तोडुन चोरुन नेली आहे, वगैरे फिर्यादीवरुन पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरील दाखल गुन्हयाचे अनुषंगाने पोलीस अधीक्षक, बीड यांनी सदरील मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे सुचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या. त्या नुसार स्थानिक गुन्हे शाखेने गुन्हा उघडकीस आणण्याचे प्रयत्न सुरु केले असता दिनांक २० जून रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, सदरचा गुन्हा हा अतुल विक्रम वाघमारे याने केला. आरोपी अतुल विक्रम वाघमारे हा संभाजीनगर, बीड येथील किरायच्या राहत्या घराचे जवळ थांबला आहे अशी माहीती वरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने छापा मारुन पकडले. त्याचे ताब्यातुन वेगवेगळ्या कंपणीच्या पाच दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. सदर मोटार सायकल बाबत विचारणा केली असता सदरील मोटार सायकली या बीड परीसरात वेगवेगळ्ळया ठिकाणाहुन चोरल्या आहेत. असे आरोपीने सांगीतले त्यापैकी होंडी कंपणीचे शाईन दुचाकी जिचा चेसीस क्रमांक एमई ४८५६ जी एम डी २०८८०२ आम्ही खात्री केली असता सदरील मोटार सायकल हि पोलीस ठाणे शिवाजीनगर गुर.नं ३४१/२०२५ कलम ३०३ (२) बी.एन.एस मधील असल्याची खात्री झाली. आरोपीने एकुण पाच मोटार सायकली चोरल्याचे कबुल केले. आरोपी व पाच दुचाकी पुढील तपासकामी पोलीस ठाणे शिवाजीनगर यांचे ताब्यात दिले आहेत. आरोपी अतुल विक्रम वाघमारे याचेवर दरोडेसारखे बरेच गुन्हे दाखल असल्याचे पोलीस अभिलेखावरुन दिसुन येत आहे.सदरील कारवाई पोलीस अधीक्षक नवनित कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, विकास राठोड, भागवत शेलार, दिपक खांडेकर, आशपाक शेख, चालक संजय जायभाये यांनी केली आहे.

### निवडणुकीचे फुटेज

प्रकियेशी संबंधित व्हिडीओ, बूथवरील सीसीटीव्ही फुटेज, संग्रहित फोटो निवडणुकीनंतर ४५ दिवसांत नष्ट करा, असे आदेश राज्यांच्या निवडणूक अधिकाऱ्यांना केंद्रीय निवडणूक आयोगाने दिले आहेत. निवडणूक प्रक्रियेचे व्हिडीओ शूटिंग आणि छायाचित्रणाचा गैरवापर करण्याच्या घटना घडल्या आहेत. सोशल मीडियावर कोणताही संदर्भ न देता, चुकीच्या पद्धतीने हे फूटेज प्रसारित करण्यात आल्याचे समोर आले आहे. त्यामुळे निवडणुक आयोगाने हा निर्णय घेतला आहे. दरम्यान महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत मतदानाचा वाढलेला टक्का, लोकसभेनंतर अचानक वाढलेली मतदार संख्या संशयाच्या भोव-यात असताना फुटेज ४५ दिवसांत नष्ट करण्याच्या सूचनेमुळे विरोधकांनी निवडणुक आयोगावर टीकेची झोड उठवली आहे.

### आरोग्य जीवनासाठी

जिल्हा प्रशासनाबरोबरच पतंजली योगपीठ, योगा असोसिएशन, योगा संघटना आणि विविध सामाजिक संस्था सहभागी झाल्या होत्या. योग दिनाच्या कार्यक्रमात जिल्हा शालेय शिक्षक संजय राऊत, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता तोंडे, जिल्हा आरोग्य अधिकारी गंडाळ, नूतन माध्यमिक शिक्षणाधिकारी पाटील, शिक्षणाधिकारी (प्रा.) भगवान फुलारी, योजना शिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले, जिल्हा योगा असोसिएशनचे सचिव विनायक वझे, क्रीडा संघटक तथा शिवछत्रपती राज्य पुरस्कारार्थी प्रा. जे.पी. शेळके, योगगुरू विकास गवते, भागवत वाघ, मयुरेश गावस्कर आदींची उपस्थिती होती. यावेळी योगगुरु आणि क्रीडा क्षेत्रातील गुणवंतांचा सत्कार जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन विकास गवते यांनी तर आभार विद्यागर यांनी मानले.

### पाकिस्तानची उपासमार

दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान संबंध अधिकच तणावपूर्ण झाले. या पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तानच्या नागरिकांना देशाबाहेर पाठविण्यासारखे अनेक निर्णय घेतले.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि. २२ जुन २०२५


## चौसाळाच्या उपसरपंचावर अविश्वास ठरावा येणार

चौसाळा। प्रतिनिधी

तालुक्यातील राजकीय क्षेत्रातील नेहमीच चर्चेत असणारी चौसाळा ग्रामपंचायतचे उपसरपंच यांच्यावर चौसाळ्याचे सरपंच सह १२ सदस्यांनी अविश्वास ठराव दाखल केला आहे तर उपसरपंच अंकुश कळासे यांनी ग्रामपंचायत चा स्वतःच राजीनामा देणार. असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली आहे सदर चौसाळाच्या उपसरपंच अविश्वास प्रकरणे माहिती कळते की सरपंच मंगल ताई लोढा यांनी दिलेल्या निवेदनात सांगितले आहे की उपसरपंच यांच्यावर आमचा विश्वास राहिला नाही त्यांनी आपले उपसरपंच हे पद १वर्षाचे असून आपण १वर्षानंतर दुसऱ्या सदस्य ला संधी देण्याचे सर्वानुमते निर्णय झाला होता परंतु त्याने २वर्ष होऊन आपल्या पदाचा. स्वतः हून राजीनामा न दिल्याने आम्ही बारा सदस्यासह त्यांच्यावर अविश्वासाचा ठराव दाखल केला आहे

# बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचा २१ वा वर्धापन दिन व जागतिक योग दिन उत्साहात

## बालाजी शिक्षण मंडळाच्या वतीने गुणवंतांचा सन्मान व कौतुक सोहळा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचा २१ वा वर्धापन दिन तसेच जागतिक योग दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी संस्थेच्या गौरवशाली वाटचालीचा आढावा घेत, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थेने दिलेल्या योगदानाचा गौरव करण्यात आला. सन २००४ मध्ये श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना झाली. संस्थेच्या अंतर्गत विविध शैक्षणिक उपक्रम प्रभावीपणे राबवले जात आहेत. अंबाजोगाई परिसरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि आधुनिक शिक्षण देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली न्यू व्हिजन पब्लिक स्कूल () ही शाळा आज एका विशाल वटवृक्षासारखी बहरलेली आहे. या शाळेत विद्यार्थ्यांना जीवनमूल्ये, शिस्त, संस्कार, विज्ञान, तंत्रज्ञान व संगणकाचे सर्वांगीण ज्ञान दिले जाते.

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाकडून मानवविकास अपंग , मूकबधिर विद्यालय, जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक विद्यालय, घाट नागनाथ विद्यालय,न्यू व्हिजन पब्लिक स्कुल(), अध्यापक महाविद्यालय, फार्मसी महाविद्यालय बीसीएस विद्यालय, स्वच्छता निरीक्षक महाविद्यालय यासह विविध प्रकारचे अभ्यासक्रम श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना शिकवले जातात.



संस्थेच्या या अचूक व गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे इयत्ता दहावी व बारावी उत्तीर्ण होऊन गेलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत आहेत. काही विद्यार्थी परदेशात उच्च शिक्षण घेत आहेत तर काही समाजसेवेच्या माध्यमातून अंबाजोगाईचे नाव उज्वल करत आहेत. वर्धापन दिनाच्या निमित्ताने केक कापून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित बी. फार्मसी महाविद्यालय, अंबाजोगाई येथे आंतरराष्ट्रीय योग दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ७:०० ते ९:०० या वेळेत झालेल्या या कार्यक्रमात महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि अतिथी यांनी सक्रिय सहभाग घेतला. प्राचार्य डॉ. संतोष तरके यांनी योगाचे आधुनिक जीवनातील महत्त्व विशद केले. ‘‘योग हा केवळ शारीरिक व्यायाम नसून, तो आरोग्य, मानसिक शांती आणि आध्यात्मिक समृद्धीचा पाया आहे,‘‘ असे मत त्यांनी व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख मामून खुरेशी यांनी कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट करून सर्वांना योगाभ्यासासाठी प्रोत्साहित केले. योग प्रशिक्षक अमर कावरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहभागींनी प्राणायाम कपालभाती, अनुलोम- विलोम, भ्रामरीद्वारे श्वसन नियंत्रण शिकवले. योगासने: सूर्य नमस्कार, ताडासन, भुजंगासन, धनुरासन यासारख्या आसनांचा सराव केला. १० मिनिटांच्या मौन ध्यानाने मनःशांतीचा अनुभव घेतला. विद्यार्थिनी योगामुळे तणाव कमी होतो आणि एकाग्रता वाढते याचा प्रत्यक्ष अनुभव योग्य गुरू अमर कावरे यांच्याकडून घेतला. योगाला दैनंदिन आयुष्यात समाविष्ट करण्याचा आग्रह देखील त्यांनी याप्रसंगी धरला.कार्यक्रमाच्या शेवटी सहभागींना सहभाग प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. प्राचार्य संतोष तरके यानी भविष्यातही अशा उपक्रमांना प्राधान्य देण्याचे आश्वासन दिले. आजच्या योगसाधना कार्यक्रमात १२० हून अधिक योगसाधक उपस्थित होते. योगासनांबरोबरच आहार आणि आरोग्यावरील मार्गदर्शन देखील योगगुरू अमर कावरे यांनी केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दलची जिज्ञासा वाढली आणि ‘‘प्रत्येक दिन योग दिन‘‘ हे संदेश विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परिसरातील सर्वांना दिला. जागतिक योगदिन तसेच संस्थेचा २१ वा वर्धापन दिन यानिमित्ताने संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी , मार्गदर्शक बी. आय. खडकभावी, मार्गदर्शक वसंत चव्हाण, मार्गदर्शक डी. एच. थोरात, प्राचार्य एम. प्रशांत कुमार यानी उपस्थित सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, पालक-शिक्षक समिती व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## योग साधना ही भारतीय संस्कृतीने जगाला दिलेले वरदान आहे -संतोष रुईकर



माजलगाव। प्रतिनिधी

तहसील कार्यालय, गटशिक्षणाधिकारी कार्यालय व श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने येथील श्री सिद्धेश्वर विद्यालयात योग दिनानिमित्त आयोजित योग शिबीराच्या प्रसंगी तहसीलदार संतोष रुईकर बोलत होते यावेळी त्यांनी सांगितले की, जीवनात आरोग्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे भारतीय संस्कृतीने जगाला योग साधना ही दिलेले फार मोठे वरदान आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून दूर राहिले पाहिजे यामुळे मैदानी खेळ खेळण्याचा आनंद कोसो दूर जात आहे. योग ही सातत्याने व नित्यनियमाने केल्यास आपण आरोग्यदायी जीवन जगु शकतो.

या कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन व बलाचे उपासक हनुमान, माता सरस्वती चे पूजन करुन झाली. यावेळी गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे , माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, संस्था सभासद अंबादास रोकडे, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुमती गिरी, शिशु विहार च्या श्रीमती वर्षा कुलकर्णी इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यानंतर गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी योग शिक्षक तथा पर्यवेक्षक रवींद्र खोडवे यांनी विविध प्रकारचे बैठे, खडे योगासने, प्राणायाम, ध्यान यांची प्रात्यक्षिके करून घेतले व महिला प्रशिक्षिका श्रीमती नागरगोजे यांनी महिला कर्मचारी यांचे प्रात्यक्षिके स्वामी विवेकानंद सभागृहात घेतले. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप प्रकाश दुगड यांनी केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर यांनी केले. आभार पर्यवेक्षक सदाशिव ढगे यांनी मानले, सुत्रसंचलन अंजली वाघमारे यांनी केले. यावेळी शाळेचे उपमुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

## सुरज कोळपेचे एमएचटी सीईटी परीक्षेत यश



वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचाळा येथील,अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ,संचलित अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी चि.सुरज पांडुरंग कोळपे यांनी महाराष्ट्र कॉमन एंट्रेंस टेस्ट(एमएचटी-सीईटी )पीसीएम-२०२५ च्या परीक्षेत ९५.०० गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, इंजीनियरिंग व फार्मसी प्रवेशासाठी महाराष्ट्र राज्यात एकाच वेळी इंग्रजी माध्यमातून एमएचटी-सीईटी परीक्षा घेतली जाते-२०२५ च्या परीक्षेचा पीसीएमचा निकाल सोमवार दि.१६ जून २०२५ रोजी अधिकृत वेबसाईटवर ऑनलाईन जाहीर करण्यात आला या परीक्षेत अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी चि.सुरज पांडुरंग कोळपे याने ९५.०० % गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे ग्रामीण भागातील शाळेत शिक्षण घेऊन अथक परिश्रम आणि अभ्यासाच्या जोरावर हे यश संपादन केले त्यांने अशोक माध्यमिक विद्यालयाचे नाव जिल्ह्यात रोशन केल्याबद्दल या शाळेच्या संस्थेचे संस्थापक,अध्यक्ष मा.सर्जेरावजी काळे सर,युवा नेतृत्व मा.ॲड.आनंद भैय्या काळे तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री.बी.आर.सावंत सर तसेच विद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षक-शिक्षिका आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सत्कार व अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

## शिक्षण तीर्थ संस्कृती विद्यालयात योग दिन साजरा

बीड। प्रतिनिधी

दिनांक २१ जून २०२५ रोजी शिक्षण तीर्थ संस्कृती विद्यालय येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला आमदार माननीय संजयजी केनेकर ,भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख ,दादासाहेब ननवरे प्रदेश सरचिटणीस भाजपा , श्री . बालाजी पवार , मार्गदर्शक देविदास नागरगोजे साहेब , ओ प्रकाश गिरी , संस्कृती विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष डॉ . दत्ता नलावडे सर यांची प्रमुख उपस्थिती होती .

योगदिनाचे औचित्य साधून आदरणीय आमदार साहेबांनी शिक्षणतीर्थ संस्कृती विद्यालयाला भेट दिली .मार्गदर्शन करतांना आमदार साहेबांनी संस्कृती विद्यालयात होणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले .भारतीय शिक्षणपद्धती व आधुनिक शिक्षण पद्धतीचा सुरेख संगम या ठिकाणी पाहायला मिळतो . या गुरुकुलात शिकणारी मुले भविष्यात देशाचे नेतृत्व करतील , वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये ताऱ्याप्रमाणे चमकतील अशी आशा आमदार साहेबांनी व्यक्त केली . शाळा खूप मोठी व्हावी यासाठी शुभेच्छा दिल्या . गुरुकुलाला हवी ती मदत करण्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले.तुम्ही खूप चांगल्या जागेवर व चांगल्या व्यक्तीच्या जवळ शिकत असल्याबद्दलही त्यांनी समाधान व्यक्त केले .भाजपाध्यक्ष देशमुख साहेब यांनी शाळेबद्दल खूप चांगले गौरव उद्गार काढले भविष्यात शाळेला हवी ती मदत करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले . श्री . ननवरे साहेबांनी व ओमप्रकाश गिरी यांनी हा कार्यक्रम घडवून आणला . कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्कृती विद्यालयाच्या व भाजपा कार्यकर्त्यांची खूप मदत झाली



## पाटोद्यात सोयाबीनचे बोगस बियाणे

### कृषी विभागाचे दुर्लक्ष;शेतकऱ्यांचे नुकसान



पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील महासांगवी येथील शेतकरी कैलास विलास गर्जे यांनी आपल्या घोलप वस्ती येथील शेतात बुस्टर सोयाबीन जे.एस.३३५ या वाणाचे बियाणे अडीच एकरात पेरले होते मात्र सदर बियाणे हे बोगस निघाले असून ते उगवलं नाही त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून तरी याची चौकशी करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी गर्जे यांनी केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की पाटोदा तालुक्यातील अनेक कृषी दुकानांमध्ये बोगस बियाणे व खते हे मिलीभगत कृषी विभागाच्या आशीर्वादाने चालू असून त्यातच महासांगवीतील शेतकरी कैलास विलास गर्जे यांनी पाटोदा शहरातील एका कृषी रामेश्वर कृषी ॲग्रो सर्व्हिसेस मांजर सूंबा रोड दुकानातून बूस्टर सोयाबीन जे.एस.३३५ हे.दि.२८/५/२०२५ रोजी खरेदी केले होते व अडिच एकरात पेरले मात्र हे बियाणे उगवले नसून यामुळे या शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून या बोगस बियाणे प्रकरणी संबंधित कंपनी व संबंधितावर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी शेतकरी कैलास विलास गर्जे यांनी केली आहे या बोगस बियाणामुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.

### जाहीर प्रगटन

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय शिरूर का. जि.बीड**

Email. tahshildarshirurkasar@gmail.com

**दूरध्वनी क्रमांक ०२४४४२५९३५९**

**क्र.२०२५ /विलंब जन्म नोंद/**

**विलंब जन्म नोंदणी जाहीर प्रगटन**

मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर का. यांच्या न्यायालयात जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये दाखल प्रकरणात जन्म नोंद घेण्याबाबत

ज्याअर्थी अर्जदार नामे दादासाहेब सिताराम पठाडे रा. गाजीपुर ता. शिरूर कासार जि. बीड यांनी स्वतःचा मुलगा नामे सुशांत दादासाहेब पठाडे रा. गाजीपुर, ता. शिरूर कासार, जि. बीड यांचा जन्म दिनांक १३/११/२००७ रोजी गाजीपुर ता. शिरूर कासार, जि. बीड येथे झाल्याचा विलंब जन्म नोंदणी आदेश मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी या जन्म दिनांका बाबत कोणास आक्षेप असल्यास सदर अक्षर स्वतः किंवा आपले वकिलामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून १५ दिवसात नोंदवावा. अन्यथा कोणाचाही काही आक्षेप नाही असे समजून अर्जाची सोनवणे घेऊन विलंबाने जन्म नोंद घेण्याबाबत आदेश केला जाईल.

**सुरेश घोळवे**
तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर कासार

स्वाक्षरित
**क लिपीक**
(शिक्का)

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८५६/२०२५**

**मार्फत जाधव सी.बी.**

अर्जदार१) अनिता भ्र. रामदास थोरात वय :४८ वर्ष धंदाघरकाम रा. लिंबागणेश ता. जि. बीड ह.मु. तरवडे वस्ती, साठे नगर,मोहमंदवाडी, हडपसर पुणे. २) संतोष पि .रामदास थोरात वय ३२ वर्षे धंदा मजुरी रा. लिंबागणेश ता. जि. बीड ह. मु. तरवडे वस्ती, साठे नगर, मोहमंदवाडी, हडपसर पुणे. ३) राहुल पि. रामदास थोरात, वय२९ वर्ष, धंदामजुरी, रा. लिंबागणेश ता.जि. बीड ह. मु. तरवडे वस्ती, साठे नगर, मोहमंदवाडी, हडपसर पुणे. ४) अतुल पि.रामदास थोरात, वय२८ वर्षे, धंदामजुरी, रा. लिंबागणेश ता. जि. बीड ह. मु. तरवडे वस्ती, साठे नगर, महमंदवाडी, हडपसर पुणे.

विरुद्ध गैरहजर: निरंक अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण:बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे रामदास पि. मनोहर थोरात यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत नामे रामदास पि. मनोहर थोरात, राहणार लिंबागणेश, बीड ता. जि. बीड ह. मु. तरवडे वस्ती, साठे नगर, मोहमंदवाडी, हडपसर, पुणे हे दिनांक १४/०८/२०२१ रोजी ससून जनरल हॉस्पिटल, पुणे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र.२ते४ हे मयताचे मुले आहेत. मयताचे आई-वडील यापूर्वीच मयत झालेले आहेत. मयतास मुलगी नाही. अर्जदार त्यांच्याशिवाय मयताचे इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदाराची अशी ही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरिता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी जर मदत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कात त्यांच्या हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. पुढील दिनांक १९/०७/२०२५ आहे.

आज दिनांक २०/०६/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

स्वाक्षरित
**क लिपीक**
(शिक्का)

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

## जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात योग दिन



पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येतील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रीडा विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ विश्वास कदम कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर प्रमुख पाहुणे म्हणून योगाचार्य संजय गीते महाराज राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक बापू घोक्षे सर क्रीडा विभागाचे प्रमुख प्रवीण शिलेदार सर प्राध्यापक गोपाळ धांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करून या शिबिराची सुरुवात झाली या शिबिरात महाविद्यालयातील सर्व कर्मचारी विद्यार्थीनी यांनी सहभाग घेतला या प्रशिक्षण शिबिरात योगाचार्य संजय गीते सर यांनी विद्यार्थ्यांना योग प्रशिक्षणाबरोबर योग प्राणायाम या विषयावर मार्गदर्शन केले व चांगल्या आरोग्यासाठी विद्यार्थ्यांनी दररोज योगासने केली पाहिजेत मानसिक आरोग्य दृढ करण्यासाठी योग साधना करण्याचे आव्हान त्यांनी केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक डॉ अशोक देवगडे सर यांनी केले तर आभार कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक डॉ लोखंडे सर यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा डॉक्टर प्रवीण कनिष्ठ विभाग प्रमुख प्राध्यापक सतीश जरांगे सर प्राध्यापक बजरंग दिसले प्राध्यापक सर सर डॉ वंदन जाधव सर महाविद्यालयातील सर्व कर्मचारी विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी सहकार्य केले या कार्यक्रमाचे लाईव्ह फेसबुक प्रक्षेपण मराठी विभागाच्या वतीने प्राध्यापक बापू घोक्षे यांनी केली राष्ट्रगीताने शिबिराची सांगता करण्यात आली

### जाहीर प्रगटन

**मा. विशाखा बी.पाटील ७ वे सह, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८५९ /२०२५**

अर्जदार१) गंगुबाई भ्र. अनुरथ थोरात वय :५४ वर्ष धंदाघरकाम रा. लिंबागणेश ता. जि. बीड ह.मु. स .न.३५, गल्ली नं.३ इंद्रायणी मंगल कार्यालयासमोर, काळे बारोटे पडळ, हडपसर पुणे.२) काळूराम पि . अनुरथ थोरात वय४१ वर्षे, धंदा मजुरी, रा. वरील प्रमाणे ३) सचिन पि. अनुरथ थोरात, वय३८ वर्ष, धंदामजुरी, रा. वरील प्रमाणे

मागणी: वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयतअनुरथ पि. मनाहर थोरात, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थीअनुरथ पि. मनाहर थोरात, मृत्यू दि.१६/०९/२०२० रोजी वाय.सी. एम. एच. हॉस्पिटल, पिंपरी येथे मयत झाले असून अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी आहे.२ व ३ हे मयताची मुले आहेत. यांना अर्जदार व्यतिरिक्त इतर कुणीही वारस नाहीत. असे अर्जात नमूद आहे. वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत. त्यांनी ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकतीन दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयतअनुरथ पि. मनाहर थोरात, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक .१२/०६/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २१/०७/२०२५ आहे.**

स्वाक्षरित
**क लिपीक**
(शिक्का)

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

### जाहीर प्रगटन

**मा. श्री आर. जी.बागडे साहेब ६ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ८५८/२०२५**

**सखुबाई विरुद्ध निरंक**

अर्जदार १) सखुबाई भ्र.दासू थोरात, वय ६२ वर्षे, धंदा घरकाम, रा. लिंबागणेश, ता. ह. मु. स.न ३५ काळे पडळ, बालाजी सुपर मार्केट समोर, हडपसर पुणे ता. जि. पुणे.२) कैलास पि. दासू थोरात, वय ४५ वर्षे, धंदा मजुरी, रा.वरील प्रमाणे ३) रवींद्र पि. दासू थोरात, वय ४२ वर्षे, धंदा मजुरी रा. वरील प्रमाणे विरुद्ध निरंक मागणीबॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत दासू पि. गणपत थोरात मृत्यू झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी मयत दासू पि. गणपत थोरात यांचा मृत्यू दिनांक ०२/१२/२०१० रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मिळतात इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत दासू पि.गणपत थोरात यांच्या मृत्यूनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत दासू पि. गणपत थोरात यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०६/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि.२२/०७/२०२५ आहे.

स्वाक्षरित
**क लिपीक**
(शिक्का)

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

# दूध भेसळ रोखण्यासाठी लवकरच नवीन कायदा

## दुग्धविकासमंत्री अतुल सावे






पुणे : राज्यात दूध भेसळ रोखण्याससाठी लवकरच नवा कायदा आणला जाईल, अशी माहिती राज्याचे दुग्धविकासमंत्री अतुल सावे यांनी दिली आहे. राज्यातील दूध भेसळीवर मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीत मंत्री सावे यांनी १५० दिवसांच्या आराखाड्याचा आढावा घेतला. यावेळी दुग्धविकास विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., महानंदचे व्यवस्थापकीय संचालक अनिल हातेकर यांच्यासह राज्यातील प्रमुख दूध संघांचे प्रतिनिधी (दूरदृश्य प्रणालीद्वारे) तसेच विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत दूध संघाच्या प्रतिनिधींनी अनेक सूचना केल्या. यामध्ये राज्यात दुधाला समान दर, एक राज्य एक ब्रँड, एक जिल्हा एक दूध संघ तसेच एक गाव एक दूध संस्था स्थापन करण्याची मागणी प्रतिनिधींनी केली. त्यावर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असं मंत्री सावे यांनी सांगितले.

मुंबईतील आरे स्टॉलचे अत्याधुनिकरण करण्यात येईल. दिवसातून दोन वेळा दूध संकलन करण्याची मागणी पूर्ण करण्याबाबत विचार करण्यात येईल. तसेच दूध संकलनासाठी शेतकरी प्रोड्युसर कंपन्याची मदत घेण्याबाबत निर्णय घेतला जाईल. महानंदद्वारे अधिकाधिक दूध संकलन वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याची सूचना मंत्री सावे यांनी दिली. दरम्यान, राज्यात दूध भेसळ मोठ्या प्रमाणात वाढली आहे. दूध भेसळीमुळे ग्राहकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे दूध भेसळ करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी ग्राहकांकडून केली जात आहे.

## गोगलगायीच्या नियंत्रणासाठी जाणून घ्या सोपे उपाय



गोगलगायी जून ते सप्टेंबर या काळात अत्यंत सक्रिय असतात व रोपावस्थेतील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करतात त्यामुळे पीक संपूर्ण नष्ट होते. गोगलगाय ही बहूभक्षी किड असून ती विशेषतः रोपावस्थेत पिकाचे अधाशासारखे पाने खाऊन अतोनात नुकसान करते. निशाचर असल्याने रात्रीच्या वेळी बाहेर पडलेल्या गोगलगायी रोपांची पाने खातात व शेताचे नुकसान होते.

गोगलगायी नियंत्रणासाठी उपाय : सायंकाळी किंवा सूर्योदयापूर्वी शेतातील गोगलगायी गोळा करून साबणाच्या अथवा मिठाच्या पाण्यात बुडवून माराव्यात किंवा शेतातून मोठ्या शंखी गोगलगायी जमा करून प्लास्टिकच्या पोत्यात भरून त्यात कोरडे मीठ अथवा चुना टाकून त्या पोत्याचे तोंड उघडे न ठेवता घट्ट बंद करावे, जेणेकरून त्यामधील गोगलगायी पोत्यातून बाहेर न जाता मिठाच्या किंवा चुन्याच्या संपर्कात येऊन आतमध्येच मरून जातील.

गोगलगायी जमा करताना अथवा हाताळणी करताना उघड्या हाताने न करता हातमोजे व तोंडावर मास्क घालूनच करणे गरजेचे आहे. शेतामध्ये किंवा बागेमध्ये ७ ते ८ मीटर अंतरावर वाळलेल्या गवताचे किंवा भाजीपाला पिकाच्या अवशेषाचे ढीग अथवा गोणपाट गुळाच्या पाण्यात ओले करून शेतात ठिक ठिकाणी ठेवावेत. गोगलगायी त्या ठिकाणी आश्रयाला जातात. सूर्योदयानंतर त्याखाली गोळा झालेल्या गोगलगायी व त्यांची अंडी गोळा करून मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट करावी. लहान शंखीच्या नियंत्रणासाठी १० टक्के मिठाची (१०० ग्रॅम प्रति १ लिटर पाणी) फवारणी फायदेशीर दिसून आली आहे. बोर्डो मिश्रण (१ किलो मोरचूद १ किलो चुना + १०० लिटर पाण्यात), कॉपर सल्फेट म्हणजेच मोरचूद (३०० ग्रॅम १० लिटर पाण्यात) किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड (२५ ग्रॅम १० लिटर पाण्यात) इत्यादीच्या फवारण्या गोगलगाय नियंत्रणासाठी नोंदणीकृत नाहीत, परंतु गोगलगाय नियंत्रणासाठी किंवा त्यांना अटकाव करण्यासाठी फळबागेत काही प्रमाणात परिणामकारक आहेत.

अशाप्रकारे शंखी गोगलगायींचा प्रादुर्भाव ज्या भागात मोठ्या प्रमाणात दिसून येत असेल त्या भागातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सामूहिकरित्या वरीलप्रमाणे उपाययोजना पावसाळ्याच्या सुरवातीपासूनच केल्यास गोगलगायीचे नियंत्रण अधिक प्रभावीपणे होते.

## पेरणीसाठी टोकन यंत्र ठरतेय फायदेशीर




सध्या खरीप हंगामातील सोयाबीन, मका, तूर व इतर कडधान्यांबरोबरच भुईमुगाच्या पेरणीला सुरुवात झाली आहे. या पेरणी काळात मजुरांची सर्वत्र कमतरता भासत आहे. यावर पर्याय म्हणून सध्या शेतकरी टोकण यंत्राला पसंती देत असून त्याद्वारे पेरणी करीत आहेत. या लागवड पद्धतीने वेळ, पैसा तसेच श्रमातही बचत होत आहे.

पेरणीची लगबग म्हटली की शेतकऱ्याला कामे आटोपण्याची घाई असते. नेमके त्याच वेळेस मजुरांची कमतरता भासते. त्याबरोबरच मजुरीचे दरही गगनाला भिडतात. गेल्या काही वर्षांत शेतीत आधुनिकता आली असून यांत्रिक शेती करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. सध्या पावसाने दमदार एन्ट्री केल्याने पेरणीला वेग आला आहे. शेतकरी कापूस, सोयाबीन, मका, तूर, उडीद, मूग आदी पिकांची पेरणी करीत असून मजुरांची एकच धांदल उडाली आहे. शेतकऱ्यांनी मका, तूर, सोयाबीन, उडीद, मूग व भुईमुगाच्या पेरणीसाठी सर्रास टोकण यंत्र वापरण्याकडे भर दिला आहे. पेरणीचे हे टोकण यंत्र वाजवी किमतीत उपलब्ध असून वापरण्यास अगदी सोपे आहे. वजनाने हलके असल्याने एक व्यक्ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहज नेऊ शकतो व पेरणी करू शकतो.

एका दिवसात चार ते पाच एकरची पेरणी या यंत्राच्या साहाय्याने बियाणे टोकण केले जाते. यात वेगवेगळ्या प्रकारचे टोकण रोलर असल्याने सर्व प्रकारचे बियाणे लावता येते. बियाण्याची खोली आणि एक व दोन बियाणे एकदाच टोकण करता येतात. या यंत्रात एकावेळी जवळपास दोन किलो बियाणे बसते. एक व्यक्ती एका दिवसात चार ते पाच एकर बियाणे शेतात सहज टोकण करू शकतो.

## झिनिया फूलशेती! एक चांगला उत्पन्न देणारा फूलशेती पर्याय



झिनियाचे फुल म्हटले की, आपल्या डोळ्यासमोर येतात ती रंगबिरंगी नाजूक फुले. झिनीयाचे फुल हे खुप आकर्षक असते. विविध रंगातील टपोरे झिनिया हे अनेकांचे आवडते फुल असते. हे नेहमी आपल्याला घरासमोर कुंडीत, बगिचेमध्ये दिसत असते पण या फुलांची लागवड ही फार कमी प्रमाणात व्यापारी तत्वावर केली जाते. मेक्सिको हे या फुलाचे उगमस्थान जरी असले तरी, त्याची लागवड भारतात फार वर्षपासून सूरु झाली आहे.

मेक्सिकोमधून मग ह्या फुलाचा प्रसार हा अमेरिका आणि इतर देशांमध्ये झाला. या फुलाच्या लागवडीसाठी उष्ण आणि दमट हवामान लागते. खूप जास्त थंडी ह्या झाडाला मानवत नाही. या फुलांसाठी जमीन ही मध्यम काळी ते भारी काळी जमीन लागते. पण मुरमाड जमिनीत जर चांगल्या प्रकारे शेणखत वगैरे टाकले तर तेथेही याचे उत्पादन येऊ शकते.

झिनिया फुलाच्या उन्नत जाती :१) झिनिया लिनीओरिसा (बटन झिनिया). २)झिनिया इलेगनस(गेंदा झिनिया). ३)झिनिया हजेना(बुटका झिनिया).

लागवड वेळ व पद्धत : झिनियची लागवड ही मुख्यतः जुलै- ऑगस्ट महिन्यामध्ये केली जाते. हे लागवड करताना दोन रोपांमधील व दोन ओळींमधील अंतर हे ४५ बाय ४५ सेंटीमीटर असे असावे. गादीवाफ्यावरील रोपांची वाढ १५ सेंटीमिटर किंवा जास्त झाली असली तर लागवडीच्या वेळी रोपांचे शेंडे खुडून रोपे लावावीत. यामुळे फुलांचा बहर चांगला येतो. या फुलांच्या झाडाच्या लागवडीसाठी जवळच्या कृषी केंद्रावर रोपे उपलब्ध होऊ शकतील. यामुळे फुलांची शेती करत असाल तर हा एक चांगला पर्याय होऊ शकतो.

## जनावरांच्या आहारात मोहरी तेलाचा समावेश केल्यास दूध उत्पादन वाढते



पशुंना मोहरीचे तेल दिल्याने वासरांची तबेत देखील सुधारते. कारण सुरुवातीला काही दिवस आपण वासरांना जनावरांचे दूध पाजतो. म्हणून वासरांना देखील त्याचा फायदा होतो. थकलेल्या जनावरांना मोहरीचे तेल थोडेसे देणे फायदेशीर ठरते. विशेषत: लांबच्या प्रवासानंतर जनावरे येतात किंवा खरेदी करून आणली जातात. अशा स्थितीत अशक्तपणा आणि थकवा आल्याने ताप येण्याची शक्यता असते.शेतकऱ्यांचा जोडधंदा म्हणून दूध व्यवसायाकडे पाहिले जाते. तसेच बहुतांश शेतकऱ्यांचा आर्थिक उदारनिर्वाह हा दूध व्यवसायावर अवलंबून असतो. यामुळे शेतकरी पशुची उत्तम काळजी घेतात. तसेच जनावरांचे दूध उत्पादन हे त्यांच्या आहारावर अवलंबून असल्याने खासकरुन शेतकरी त्याकडे जास्त लक्ष देतात. जनावरांना चांगला संतुलित आहार, हिरवा चारा, तेलाची पोळी आणि अन्य आहार दिल्यास जनावरांमधील दूध उत्पादन वाढते. यासोबतच त्यांची प्रतिकारशक्तीही मजबूत असते. यासाठी संतुलित आहाराचा मुद्दा होता. यासोबतच कृषी तज्ज्ञ चांगल्या दर्जाच्या दूध उत्पादनासाठी जनावरांच्या आरोग्यासाठी मोहरीचे तेल देण्याची शिफारस करतात.

जनावरांना मोहरीचे तेल देण्याचे फायदे :आजारी आणि दुर्बल प्राण्यांना मोहरीचे तेल दिल्याने त्यांच्या आरोग्यात चमत्कारीक बदल होतात. मोहरीच्या तेलात भरपूर चरबी असते. ज्यामुळे प्राण्यांना ऊर्जा मिळते आणि ते चपळ होतात. त्यामुळे गायी आणि म्हशींना मोहरीचे तेल देण्याची प्रथा आहे, जेणेकरून त्यांचे आरोग्य लवकर चांगले होईल. मोहरीचे तेल प्यायल्याने जनावरांची पचनशक्ती बळकट होते. त्यामुळे जनावरांना पोटासंबंधीचे आजार होत नाहीत. पशुंना मोहरीचे तेल दिल्याने वासरांची तब्येत देखील सुधारते. कारण सुरुवातीला काही दिवस आपण वासरांना जनावरांचे दूध पाजतो. म्हणून वासरांना देखील त्याचा फायदा होतो. थकलेल्या जनावरांना मोहरीचे तेल थोडेसे देणे फायदेशीर ठरते. विशेषत: लांबच्या प्रवासानंतर जनावरे येतात किंवा खरेदी करून आणली जातात. अशा स्थितीत अशक्तपणा आणि थकवा आल्याने ताप येण्याची शक्यता असते. अशा वेळी मोहरीचे तेल दिल्यास प्राण्यांमध्ये लगेच ऊर्जा येत. मोहरीचे तेल जनावरांना खूप उपयुक्त असते.

उष्णतेपासून सुरक्षा :उन्हाळ्यात जनावरांची काळजी घेणे खूप गरजेचे असते. त्यासाठी पशुपालक देखील पशुची मोठ्या प्रमाणात काळजी घेतात. तसंच उन्हाळ्यात जनावरांना मोहरीच्या तेलाचे सेवन दिल्यास जनावरांना उष्णता संबंधित समस्यांपासून संरक्षण मिळते. दुसरीकडे जर आपण हिवाळ्याबद्दल बोललो तर, या दिवसात मोहरीचे तेल देखील प्राण्यांमध्ये उष्णता टिकवून ठेवण्यासाठी एक फायदेशीर कृती असल्याचे सिद्ध होते. पशुतज्ज्ञांच्या मते निरोगी जनावरांना मोहरीचे तेल आणि पशुखाद्य रोज देऊ नये. या गोष्टी फक्त आजारी आणि अशक्त प्राण्यांसाठीच चांगल्या आहेत.प्रमाण राखणे गरजेचे :आजारी व अशक्त जनावरांना १०० ते २०० मिली मोहरीचे तेलही दिले जाऊ शकते. यापेक्षा जास्त सेवन करणे जनावरांसाठी हानिकारक ठरू शकते. त्याचबरोबर गाई-म्हशींच्या पोटात वायू किंवा पचन खराब झाल्यास पशुवैद्यांच्या सल्ल्याने ४०० ते ५०० मिली मोहरीचे तेलही द्यावे. यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याने जनावरांना मोहरीच्या तेलाचे सेवन द्यावे. अन्यथा जनावरांना अन्य आजारांना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.फ




### महत्वाच्या घटना

१५०५ : मुघल सम्राट हुमायू यांनी आपला पुत्र अकबर यांना आपला वारीसदार म्हणून घोषित केलं.
१६३३ : गॅलेलिओ गॅलिली याने पोपच्या दबावाखाली पृथ्वी हाच सूर्यमालेचा केंद्रबिंदू आहे असे कबूल केले.
१७५७ : प्लासीची लढाई सुरू झाली.
१८९७ : चार्ल्स रँड याला दामोदर हरी चाफेकर यांनी पुण्यातील जुलमाचा वचपा म्हणून बंदुकीने गोळ्या घातल्या.
१९०८ : 'देशाचे दुर्दैव' हा जहाल अग्रलेख लिहिल्याबद्दल लोकमान्य टिळकांना ६ वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा
१९३१ : फ़र्ग्युसन महाविद्यालयाच्या ग्रंथालयात वासुदेव बळवंत गोगटे यांनी सर जॉन हॉटसन या मुंबई प्रांताच्या राज्यपालावर गोळया झाडल्या. हॉटसन वाचला. पुढे हे 'हॉटसन' गोगटे पुण्याचे महापौर बनले.
१९३९ : नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी राष्ट्रीय काँग्रेस पक्षापासून अलिप्त होऊन स्वता:च्या फॉरवर्ड ब्लॉक या राजनीतिक पक्षाची स्थापना केली.
१९४० : दुसरे महायुद्ध फ्रान्सने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९४० : नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी काँग्रेसमधुन बाहेर पडुन ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक या पक्षाची स्थापना केली.
१९४१ : नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी सावरकर सदन येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांची भेट घेतली.
१९९३ : वेषभूषाकार भानू अथैय्या यांना अमेरिकेतील अ‍ॅकेडमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट अँड सायन्स या संघटनेचे सदस्यत्त्व देण्यात आले. या सदस्यांना प्रतिष्ठेच्या ऑस्कर पुरस्काराबाबत मत देण्याचा अधिकार आहे.
१९९४ : महाराष्ट्र सरकारचे महिलाविषयक धोरण जाहीर झाले. त्याद्वारे सरकारी व निमसरकारी नोकर्यात महिलांना ३० टक्के आरक्षण.
२००१ : जागतिक जलतरण स्पर्धेत ऑस्ट्रेलियाचा मातब्बर जलतरणपटू इयान थॉर्प याने आपला पहिला विश्वविक्रम केला. त्याने ४०० मीटर फ्रीस्टाईल शर्यत ३ मिनिटे ४०.१७ सेकंद अशा विक्रमी वेळात जिंकली.
२००७ : अंतराळवीर सुनिता विल्यम यांनी सुमारे १९४ दिवस १८ तास पूर्ण करून सर्वाधिक काळ अंतराळात राहून पृथ्वीवर परत आले.
२०१६ : भारतीय अंतराळ संस्था इस्रो ने जागतिक विश्वविक्रम रचत आपल्या देशाच्या उपग्रहासह विदेशातील एकूण २० उपग्रह प्रक्षेपित करण्याचा विक्रम रचला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८०५: इटालियन स्वातंत्र्यवीर जोसेफ मॅझिनी यांचा जन्म. (मृत्यू: १० मार्च १८७२)
१८९६ : बाबुराव पेंढारकर, मराठी चित्रपट अभिनेता.
१८८७ : ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ ज्यूलियन हक्सले यांचा जन्म. (मृत्यू: १४ फेब्रुवारी १९७५)
१८९६ : नटश्रेष्ठ बाबुराव पेंढारकर यांचा जन्म.
१८९८ : पं. विनायकराव पटवर्धन शास्त्रीय गायक (मृत्यू: २३ ऑगस्ट १९७५)
१८९९ : मास्किंग टेप चे शोधक रिचर्ड गिर्ली ड्र्यू यांचा जन्म. (मृत्यू: १४ डिसेंबर १९८०)
१९०० : भारतीय स्वातंत्र्य सेनानी व राजकारणी गणेश घोष यांचा जन्मदिन.
१९०८ : महानुभाव पंथाचे अभ्यासक, विचारवंत व तत्त्वज्ञ, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विष्णू भिकाजी तथा वि. भि. कोलते यांचा जन्म. (मृत्यू: ९ एप्रिल १९९८)
१९२३ : मुकेश चंद माथूर तथा 'मुकेश' पार्श्वगायक. तीस वर्षांच्या फिल्मी कारकिर्दीत त्यांनी १०,००० हून अधिक गीतांना आवाज दिला. ऊर्दू, पंजाबी, तमिळ, बंगाली, मराठी, गुजराथी या भाषांतही त्यांनी गाणी गायली. अनुनासिक स्वर आणि गायकीत ओतप्रोत भरलेलाअ 'दर्द' ही त्यांच्या गायनशैलीची वैशिष्ट्ये होती. (मृत्यू: २७ ऑगस्ट १९७६)
१९२७ : भारतीय-इंग्लिश इतिहासकार आणि शैक्षणिक एन्थोनी लो यांचा जन्म. (मृत्यू: १२ फेब्रुवारी २०१५)
१९३२ : आंतरराष्ट्रीय किर्ती प्राप्त केलेले चित्रपट व रंगमंच कलाकार अमरीश पुरी यांचा जन्म. (मृत्यू: १२ जानेवारी २००५ मुंबई, महाराष्ट्र)
१९३७ : वसंत रांजणे मध्यमगती गोलंदाज (मृत्यू: २२ डिसेंबर २०११)
१९८० : कीर्ती चक्र व सेना पदक सन्मानित माजी भारतीय गोरखा रेजिमेंटम अधिकारी सुनील कुमार चौधरी यांचा जन्मदिन.
१९८५ : भारतीय बास्केटबॉल संघाच्या माजी कर्णधार व बास्केटबॉल खेळाडू अनिता पॉलदुराई यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२७६ : पोप इनोसंट पाचवा.
१४२९ : गियात अल काशी, पर्शियन अंतराळतज्ञ व गणितज्ञ.
१९१८ : इन्दर लाल रॉय पहिल्या महायुद्धातील भारतीय पायलट (जन्म: २ डिसेंबर १८९८)
१९४० : ब्लादिमार पी. कोपेन, रशियन हवामानशास्त्रज्ञ.
१९५५ : लेगस्पिनर व गुगली गोलंदाज सदाशिव ऊर्फ सदू शिंदे यांचे निधन. (जन्म: १८ ऑगस्ट १९२३)
१९८४ : गजानन लक्ष्मण तथा ग. ल. ठोकळ साहित्यिक व प्रकाशक (जन्म:१९०९)
१९८५ : थोर भारतीय स्वतंत्र सेनानी व समाजसुधारक आणि राजकीय कार्यकर्ता तसचं, आर्य समाज व आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीचे अनुयायी मोहरसिंग राठोड यांचे निधन.
१९८८ : भारतीय बौद्ध भिक्षू, अभ्यासक, प्रवासी व लेखक भदंत आनंद कौसल्यायन यांचे निधन.
१९९३ : चित्रपट अभिनेते विष्णूपंत जोग यांचे निधन.
१९९४ : चित्रपट निर्माते व दिग्दर्शक अक्किनेरी लक्ष्मीवर प्रसाद राव ऊर्फ एल. व्ही. प्रसाद यांचे निधन. (जन्म: १७ जानेवारी १९०८)
१९९५ : हेरॉल्ड लारवूड इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: १४ नोव्हेंबर १९०४)
२००० : हिंदी भाषिक लेखक व कवी केदारनाथ अग्रवाल यांचे निधन.
२००१ : डॉ. अरुण घोष, अर्थतज्ञ.
२००३ : उदय हुसेन सद्दाम हुसेन यांचा मुलगा (जन्म: १८ जून १९६५)
२००३ : कुसय हुसेन सद्दाम हुसेन यांचा मुलगा (जन्म: १७ मे १९६६)
२०१२ : रोमन कॅथोलिक चर्चचे भारतीय धर्मगुरू गिल्बर्ट ब्लेझ रेगो यांचे निधन.
२०१४ : भारतीय दिग्दर्शक आणि निर्माता रामा नारायणन यांचे निधन. (जन्म: ३ एप्रिल १९४९)

# दुष्काळी मराठवाडा पाणीदार होणार कसा?

बीड। प्रतिनिधी

दुष्काळी बीडला पाणीदार बनविण्यासाठी जलसंपदा विभागांकडुन १७ सिंचन प्रकल्प प्रकल्प मंजूर करण्यात आले होते.३ वर्षात प्रकल्पाचे काम सुरुच झाले नाही त्यामुळे जलसंपदा विभागाने त्याची प्रशासकीय मान्यता रद्द केली आहे.दुष्काळी बीडला हा मोठा धक्का मानला जात आहे.मात्र याचवेळी दुसरीकडे मराठवाड्यातील मोठ्या नद्यांवर कोल्हापुरी पद्धतीचे २६५४ बंधारे बांधण्यात आलेले आहेत. परंतुयातील केवळ हिंगोली जिल्ह्यात सर्व बंधा-यांना गेट नसुन उर्वरित जिल्ह्यात पावसात येणारे पाणी गेट अभावी आले तसे वाहून जाते. मराठवाड्यात १९१९१ गेटची आवश्यकता असली तरी याकडे कोणीही लोकप्रतिनिधी अथवा प्रशासकीय अधिकारी गांभीर्याने पाहायला तयार नाही ही वस्तुस्थिती आहे. या बंधाऱ्याच्या गेटच्या दुरूस्तीसाठी ५२ कोटी रूपये निधींची आवश्यकता असुन उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांनी निधीची तरतूद करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा माहिती आधिकार कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

मराठवाड्यात अनेक जिल्ह्यात डोंगररांगा





## २६५४ कोल्हापुरी बंधारे गेटविना

आहेत.या ठिकाणाहून अनेक नद्यांचा उगम होतो. डोंगररांगात पडणारे पाणी आडवुन सिंचन क्षेत्र वाढवण्यासाठी मागील अनेक वर्षातून विविध सरकारने प्रयत्न केलेले आहेत. आजवर मराठवाड्यातील नद्यांवर २६५४ कोल्हापुरी पद्धतीने बंधारे बांधण्यात आलेले आहेत. या बंधार्यावर कोट्यावधींचा खर्चही झालेला आहे. अर्थातच इतका खर्च केल्यास बंधा-यात पाणी साठणे आवश्यक आहे .परंतु असे होताना मराठवाड्यात तरी दिसत नाही. आजच्या घडीला हिंगोली वगळता २६३४ बंधा-यांना गेटची आवश्यकता आहे. २६५४ बंधाऱ्यांना ७९ , ७८१ गेट लागतात.यातील ६०,२६२ गेट आजच्या स्थितीत आहेत. परंतु १९,११९ गेटची कमतरता आहे. परिणामी प्रति बंधा-याला १ गेट नसले तरी संपूर्णपणे वाहून जाणे साहजिकच आहे. या बंधार्यांना गेट बसविण्यासाठी दरवर्षी निधीची तरतुदी होते. परंतु तरीही गेटची वाणवा कायम आहे.

### कोल्हापुरी बंधा-यावरील गेटची स्थिती

| जिल्हा | लागणारे | उपलब्ध | आवश्यक |
|---|---|---|---|
| संभाजीनगर | १८,३३१ | १८५४३ | २८३ |
| जालना | ११,२९५ | ५१५५ | ६१४० |
| परभणी | ३०४३ | १८१५ | १२२८ |
| हिंगोली | ७५५ | ७५५ | ०० |
| नांदेड | ३३३६ | २४७६ | ६८० |
| बीड | २२४४ | ७५१ | १४९१ |
| लातुर | ४४९३ | ३८२६ | ६६९ |
| धाराशिव | ३५७८४ | २७३३४ | ८४४८ |

मराठवाड्यातील २६५४ बंधा-यांना १९,११९ गेट बसविण्यासाठी २५ कोटी ४२ लाख ३९हजार रूपयांच्या निधीची आवश्यकता आहे. यात संभाजीनगर ३९ लाख, जालना ६१४, परभणी १३५ , हिंगोली ००, नांदेड १३२ , बीड १५८, लातुर ७४.४१, धाराशिव १३८९ असे एकुण ५२ कोटी ४२ लक्ष रूपयांच्या निधीची आवश्यकता आहे.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर

मराठवाड्यात सिंचनाच्या विषयाकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. दरवर्षी निधी येत असुनही ही अवस्था असेल तर दुर्दैवी आहे .सरकारने मराठवाड्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांना केली आहे .मराठवाड्यात २६५४ कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यात २३५७३५ घसेंमी सिंचन क्षमता आहे.परंतु गेट नसल्याने हे पाणी वाहून जाते . पाणी वाहून गेल्याने जवळपास १४ हजार हेक्टरवरचे सिंचन क्षेत्र कमी झाले आहे. गेट असते तर किमान १० हजार शेतकऱ्यांची जमीन ओलिताखाली आलेली दिसली असती.आज या शेतकऱ्यांना पाण्याअभावी मजुरी करावी लागत आहे. मराठवाड्यात आज गेट अभावी कोल्हापुरी बंधारे कामाचे राहिले नाहीत निरूपयोगी ठरले आहेत .हि अवस्था का झाली तर बंधा-याचे गेट चोरीला जातात अशी संबंधित विभागाचे अधिकारी कारण देतात.या एका गेटची किंमत मोठी असते.शिवाय चोरट्यांना शेतात काहीही अडथळा नसतो.त्यामुळे चोरी होते.परंतु बंधा-याचे गेट चोरीला गेले म्हणून संबंधित विभाग गुन्हे दाखल करण्यास कुचराई करतो.परीणामी चोरट्यांचे फावत चालले आहे.

## थोडक्यात



### वसंतदादा पाटील महाविद्यालयात जागतिक योगदिन साजरा

पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रीडा विभागांच्या संयुक्त विद्यमाने २१ जून रोजी जागतिक योगदिन उत्साहात साजरा करण्यात आला. योगदिनानिमित्त आयोजित योगप्रशिक्षण शिबिराच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. याप्रसंगी उपस्थितांना योगप्रशिक्षक श्री. उद्धव लाड, योगप्रशिक्षक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी यांनी विविध योगासने व प्राणायाम प्रकारांचे प्रशिक्षण दिले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. सतीश माउलगे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, क्रीडा विभागप्रमुख डॉ. विनोदचंद्र पवार, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे, कार्यालय अधीक्षक अशोक पवार यांच्यासह विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विनोदचंद्र पवार यांनी केले. आभार डॉ. सोमनाथ लांडगे यांनी मानले.

### शिष्यवृत्तीधारकांना आवाहन

जालना । प्रतिनिधी

महाडीबीटी पोर्टलवरील राईट टु गीव्ह अप या पर्यायाचे बटण नजरचुकीने अथवा अनावधानाने निवडलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज प्रिन्सिपल लॉगीनला महाडीबीटी प्रणालीवर ऑनलाईन अर्ज सादर करण्याची सवलत उपलब्ध करुन देण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ व २०२४-२५ मधील राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांकडून पोर्टलवर नजर चुकीने अथवा अनावधानाने '' राईट टु गीव्ह अप '' पर्याय निवडला गेला आहे, अशा विद्यार्थ्यांकरीता महाविद्यालयांच्या प्राचार्य लॉगीन मधून '' रिव्हर्ट राईट टु गीव्ह अप '' या पर्यायाचा वापर करुन आपला अर्ज दि.३० जुन २०२५ पुर्वी रिव्हर्ट बॅक करुन घेणे आवश्यक आहे. तसेच झालेला अर्ज देखील विहीत वेळेत म्हणजेच दि. ३० जुन २०२५ पुर्वी विद्यार्थ्यांने त्यांच्या लॉगीनमधून ऑनलाईन रित्याच फेरसादर करणे आवश्यक आहे, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त राजु एडके यांनी केले आहे .

## अनुदान घोटाळा प्रकरणी ३८ ग्रामसेवक २० कृषी सहाय्यकांवर कारवाई

जालना। प्रतिनिधी

शासकीय अनुदान वाटपात झालेल्या मोठ्या आर्थिक घोटाळ्याची चौकशी सुरू असताना, या प्रकरणात तलाठी व महसूल विभागातील कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आलेली असताना याची फेर चौकशी होणे गरजेचे आहे असे बोलले जात आहे तसेच आता ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांच्यावर सुद्धा कारवाई करण्यात आली आहे परंतु शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे गेले असता त्याची पण चौकशी होणे गरजेचे आहे तसेच या प्रकरणी काही तज्ञ सेवानिवृत्ती अधिकाऱ्याकडून बोलल्या जात आहे यासंदर्भात आरडीसी गणेश महाडिक हे ग्रामसेवक व कृषी सहायक यांचे नाव जाहीर करण्यासाठी काहीतरी स्वार्थ होतो होत असल्याचे पण बोलल्या जात आहे, तहसीलदार यांचा याप्रकरणी काही संबंध नसल्याचे पण काही सेवानिवृत्त तज्ञ अधिकाऱ्याकडून बोलल्या जात आहे .आता याच प्रकरणात दोषी आढळून आलेल्या ३८ ग्रामसेवक आणि २० कृषी सहाय्यकांवर देखील लवकरच निलंबनाची कारवाई होणार असल्याची माहिती अधिकृत सूत्रांकडून समोर आली आहे. सदरील कारवाई फक्त अंबड व घनसावंगी तालुक्यातील ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांच्यावर होणार असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून कळविण्यात येत असल्याची माहिती समोर येत आहे.

विशेषतः अंबड व घनसावंगी तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात शासकीय अनुदान वाटपाच्या प्रक्रियेत नियमांचे उल्लंघन व अपहार झाल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने ग्रामपंचायत स्तरावरील ३८ अधिकारी आणि कृषी विभागातील २० सहाय्यक कर्मचाऱ्यांवर निलंबनाची शिफारस केली आहे. या सर्व प्रकरणी सेवानिवृत्त अधिकाऱ्याकडून चौकशी करणे गरजेचे आहे असे पण बोलले जात आहे. कारवाईचा प्रस्ताव वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवला जालना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयाकडे या संदर्भात अधिकृत प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. लवकरच संबंधित कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई होण्याची शक्यता आहे. अनुदान वाटपात फसवणूक या घोटाळ्यात अनुदानासाठी अपात्र लाभार्थ्यांना निधी वितरित करणे, कागदपत्रांत फेरफार, बनावट हजेरी व कामाचे चुकीचे दस्तावेज सादर करणे अशा प्रकारच्या गंभीर गैरप्रकारांची नोंद झाली आहे. यामध्ये महसूल, ग्रामपंचायत आणि कृषी विभागातील कर्मचारी संगनमताने सहभागी असल्याचा संशय चौकशीत स्पष्ट झाला आहे. तसेच घोटाळा प्रकरणी काही राजकीय पुढाऱ्यांचा सहभाग असल्याचे पण चर्चा सुरू आहे. राजकीय पुढार्याच्या दबावामुळे काही शेतकऱ्यांना दुष्काळ अनुदानाचा लाभ देण्यात आला असल्याचे पण बोलल्या जात आहे याची पण चौकशी होणे गरजेचे आहे.

## के.एस.पी. विद्यालयात योगदिन उत्साहात



बीड । प्रतिनिधी

रोजी शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालयामधील योगदिन उत्साहात साजरा करण्यात आला. प.पू. माताजी श्री. निर्मलादेवी प्रणित सहजयोग अंतर्गत त्यांच्या साधकांनी शाळेमध्ये विद्यार्थी व शिक्षकांचा योगा घेण्यात आला. सर्वांनी उत्साहात योगासने केली.

आजच्या धावपळीच्या जीवनात तणाव, चिंता आणि आरोग्याच्या अनेक समस्यांमध्ये योग खूप उपयुक्त आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत योग दिन साजरा करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. १७५ पेक्षा जास्त देशांनी या प्रस्तावाला अनुमोदन दिले. दरवर्षी २१ जून रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय योग दिन फक्त एक दिवसाचा उत्सव नसून, आरोग्य आणि निरोगी जीवनशैलीबद्दल जागृती निर्माण करण्याचे महत्वपूर्ण माध्यम आहे. या योगदिनी प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख तसेच संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके, तसेच शाळेतील प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थितीत योगदिन उत्साहात साजरी करण्यात आली.

## स्त्री रोग तज्ज्ञ संघटना अध्यक्षपदी डॉ.कराड; सचिवपदी डॉ. शरद शिंदे

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्हा स्त्री रोग तज्ज्ञ संघटनेचे पुनरुज्जीवन करण्यात आले असून नवी कार्यकारिणीही जाहीर केली गेली आहे. अध्यक्षपदी डॉ. शालिनी कराड यांची तर सचिवपदी डॉ. शरद शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील स्त्री रोग तज्ज्ञांनी एकत्रित येऊन बीड जिल्हा स्त्री रोग तज्ज्ञ संघटना स्थापन केली होती. या संघटनेची धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणी केली होती. दरम्यान, मधल्या काळात संघटना सक्रीय नसल्याने नोंदणीबाबत तांत्रिक अडचणी आल्या होत्या. डॉ. शिवाजीराव सानप आणि डॉ. शरद शिंदे यांनी पुढाकार घेऊन व मागील समितीमधील सदस्यांच्या मदतीने अनेक वर्षांपासून रखडलेली नोंदणी नुतणीकरणाची प्रक्रिया पार पाडली व संघटनेचे पुनरुज्जीवन केले. नव्या कार्यकारिणीचा अहवाल धर्मादाय आयुक्तांना सादर करुन नव्या कार्यकारिणीस मान्यता मिळवली गेली आहे.नव्या कार्यकारिणीत अध्यक्षपदी डॉ. शालिनी कराड, उपाध्यक्षपदी डॉ. शिवाजीराव सानप, सचिवपदी डॉ. शरद शिंदे, कोषाध्यक्षपदी डॉ. संजय वीर, सहसचिवपदी डॉ. राहुलकुमार वाघमारे, चिकित्साविषयक सचिवपदी डॉ. प्रज्ञा तांबडे, ग्रंथपाल सचिवपदी डॉ. तनुजा मस्तूद यांची निवड करण्यात आली आहे. मागील काही वर्षांमध्ये बीड जिल्ह्यातील स्त्री रोगतज्ज्ञा बद्दल गैरसमज परसवण्यात आले आहेत, विविध प्रकरणांमध्ये अपूर्ण माहितीवर स्त्री रोग तज्ज्ञांची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. संघटनेच्या माध्यमातून यावर काम करून हे गैरसमज दूर करण्यासाठी काम केले जाणार आहे. असे नतुन पदाधिकाऱ्यांनी निवडीनंतर सांगितले.

## परळी शहरात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

परळी । प्रतिनिधी

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला होता. संयुक्त राष्ट्रांच्या १९३ देशांपैकी १७५ देशांच्या सहप्रतिनिधींनी या प्रस्तावाला पाठींबा दिला होता. त्यानुसार दरवर्षी २१ जून या दिवशी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा केला जातो.

त्या अनुषंगाने लोकनेत्या मा. ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे साहेब आणि मा. खा. डॉ प्रीतमताई गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ शहर भाजपा व जिजामाता गार्डन क्लब, पतंजली योग समिती, वैद्यनाथ बँक यांच्यावतीने जिजामाता गार्डन येथे योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी अनेक वर्ष परळी शहरांमध्ये योगाचे प्रशिक्षण देणाऱ्या विविध ठिकाणी योग पुरस्कार प्राप्त योगशिक्षिका सौ. सरला उपाध्याय, आणि त्यांच्या सहशिक्षिका



सौ. शालिनी बोधे यांचा भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्ष सौ. उमाताई समशेट्टी यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्याच्या मंत्री मा. ना. पंकजाताई मुंडे यांचे गौरवपत्र व शाल, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी सौ समशेट्टी यांनी योगा बद्दल माहिती दिली तसेच योगाचे महत्त्व सांगितले. दररोज योग करण्याचे अनेक फायदे आहेत. शरीर आणि मन शांत करण्यासाठी योग खूप फायदेशीर मानला जातो. योग केल्याने आपल्या शरीराला ऊर्जा मिळते. स्नायूंची ताकद वाढते. तसेच यामुळे तुमची श्वसन, ऊर्जा आणि चैतन्य सुधारते. यावेळी सोमेंद्र शास्त्री यांना स्व. वंदना पारसेवार प्रतिष्ठान तर्फे सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमास नगरपालिकेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, भाजपाचे ज्येष्ठ नेते विकासराव डुबे, वैजनाथ ताटीपामल, नागनाथ पारसेवार, राजेश कोलवार, परळीतील प्रसिद्ध व्यापारी गुलाबराव शेटे, सुभाष तोतला, ब्रिजलाल मुंदडा, चंद्रकांत मुंडे, काकानी सर, रेपे सर, चित्राताई देशपांडे, यांच्यासह महिला व पुरुषांची लक्षणीय उपस्थिती होती.

## योग केल्याने शरीराला ऊर्जा मिळते- प्रा. डॉ. अशोक नागरगोजे

### श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात योग दिन मोठ्या उत्साहात साजरा

बीड। प्रतिनिधी

शरीर आणि मन निरोगी ठेवण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी दररोज सकाळी योगासन करावे असे आवाहन प्रा. डॉ. अशोक नागरगोजे यांनी श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. दत्तात्रय चव्हाण सर हे होते. तर व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्ते तथा योग शिक्षक डॉ. संजय तांदळे, आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती सानप मॅडम आदी उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने शनिवार दि. २१ जून रोजी बीड शहरापासून जवळच असलेल्या शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. योग दिनाच्या निमित्ताने प्रा. डॉ.अशोक नागरगोजे आणि ज्येष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे यांनी विद्यार्थ्यांना योगाचे प्रात्यक्षिक करून दाखवले शिवाय योग दिना बद्दल सखोल मार्गदर्शन केले.



या वेळी बोलताना प्रा. डॉ. अशोक नागरगोजे सर यांनी योगाची सविस्तर माहिती सांगितली. योगाला प्राचीन इतिहास आहे. जगाला योगाची देणगी भारत देशाने दिली. आज जगभरातील करोडो लोक दररोज योग करून निरोगी जीवन जगत आहेत हे सांगितले. तसेच संयुक्त राष्ट्रांनी २१ जून योग दिनाला कशी मान्यता दिली याची सविस्तर माहिती दिली. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २७ सप्टेंबर २०१४ रोजी जनरल असेंब्ली () मधील भाषणादरम्यान पंतप्रधान मोदींनी आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्पना सर्वप्रथम मांडली होती. ११ डिसेंबर २०१४ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेने जाहीर केले की, २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा करण्यात यावा. पंतप्रधान मोदी यांनी 'मन की बात' या कार्यक्रमात जागतिक योग दिनाची थीम जाहीर केली. पुढे ''मानवतेसाठी योग'' अशी थीम निर्माण झाल्याचे सांगितले. आज संयुक्त राष्ट्रांच्या १९३ देशांपैकी १७५ देशांनी या प्रस्तावाला पाठिंबा दिला होता. त्यानुसार आपण २१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिवस जगभर साजरा करण्यात आला होता. पुढे २०१५ पासून दरवर्षी आपण २१ जून रोजी योग दिन साजरा करत आहोत. आज आपल्या विद्यालयात योग दिनानिमित्त उपस्थित राहण्याचा योग आला असे सांगत योगासन केल्यामुळे काय फायदे होतात याची सविस्तर माहिती दिली. योग केल्याने आपल्यामध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. योग आपल्याला वर्तमानात जगायला शिकवतो.

योगासनांमुळे स्नायूंना बळ मिळते. नियमित योगासने केल्याने शरीरातील अतिरिक्त चरबीही कमी होते. योगामुळे तणाव दूर होतो. चांगली झोप लाते. योगामुळे तुमची पचनक्रियाही सुधारते. शरीर आणि मन निरोगी राहते. स्मरणशक्ती वाढते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांनी दररोज सकाळी नित्य नियमाने योगासन करावे असे आवाहन प्रा. डॉ. अशोक नागरगोजे सर यांनी उपस्थिती विद्यार्थ्यांना केले. यावेळी उपस्थित विद्यार्थी, शिक्षक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी योग करून योग दिन साजरा केला.

## केएसके कृषि महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन



बीड । प्रतिनिधी

सौ. के.एस.के. उर्फ 'काकू' अन्नतंत्र आणि कृषि महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी, श्री अनंत कृषि विकास प्रतिष्ठाण संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके यांचे हस्ते प्रथम दिपप्रज्वलन केले. पुढे त्यांनी सर्वांना योगासनाचे महत्व पटवून सांगताना म्हणाले की, आपले शरीर, रोगप्रतीकारक शक्ती आणि आत्मीक शांतता चांगली ठेवायची असल्यास योगासन करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले. योग दिना निमित्त महाविद्यालयाला लाभलेले योग गुरु श्री. लक्ष्मण मळेकर सर यांनी वेगवेगळया पध्दतीचे योगासने आणि त्यांचे विविध आजारावर होणारे फायदे, व योगाचे मानवि जिवनातील महत्व सांगितले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी तसेच सर्व विद्यार्थ्यांनी या एक दिवसीय योग शिबीरात सहभाग नोंदवला. आंतरराष्ट्रीय योग दिना निमीत्त अन्नतंत्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.झेड.एच.सय्यद तसेच कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.पी.मोरे आणि सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परिसर स्वच्छता व प्लास्टिक मुक्तीची अंमलबजावणी करा- सीईओ रहमान

## आराखड्यातील १३५० गावात केंद्राची टीम स्वच्छ सर्वेक्षण करणार

बीड । प्रतिनिधी

स्वच्छ भारत मिशन आराखड्यातील १३५० गावांमध्ये मध्ये स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ या उपक्रमांतर्गत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनात निर्माण झालेल्या सुविधांचा वापर तसेच सार्वजनिक ठिकाणी असलेले परिसर स्वच्छता शिवाय प्रत्येक कुटुंबांना भेटी देऊन बदललेल्या मानसिकतेची माहिती घेण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीने पाहणी करण्यात येणार असल्याने सर्व ग्रामस्थांनी मिळून लोकसहभाग व श्रमदानातून या सार्वजनिक सुविधांचा पुरेपूर वापर करत परिसराची स्वच्छता, व प्लास्टिक मुक्तीची अंमलबजावणी करावी असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी केले आहे.

जिल्ह्यात दरवर्षीप्रमाणे स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण या उपक्रमामध्ये प्रत्येक ग्रामपंचायत सहभागी होत असते. केंद्र शासनाच्या वतीने प्रत्येक ग्रामपंचायतीची अद्यावत माहिती घेऊन उभारण्यात आलेल्या घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या सुविधांची चाचणी व तपासणी करण्यासाठी हे पथक जिल्ह्यात येणार आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीची तपासणी करून एक हजार गुणांपैकी प्राप्त झालेल्या गुणांकनाच्या आधारे जिल्ह्याचे गुणांकन ठरणार आहे त्याचप्रमाणे राज्याचे देखील गुणांकन देशपातळीवरती ठरणार असल्याने प्रत्येक गावाने आपापल्या सुविधांचा वापर नियमित केला पाहिजे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे. या पाहणी दरम्यान प्लास्टिक संकलन व व्यवस्थापन म्हणजेच वर्गीकरण केंद्राची पाहणी, खतखड्यांचे व्यवस्थापन, परिसर स्वच्छता तसेच गृहभेतून मिळणारी माहिती इत्यादी बाबत गुणांकन होणार आहे. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या सुविधांबाबत थेट निरीक्षणासाठी १२० गुण आहेत. ग्रामस्थांचा प्रतिसादासाठी १०० गुण, गावातील सुविधांचा वापराबाबत २४० गुण तर प्रत्यक्ष पाहणी व निरीक्षणा दरम्यान ५४० गुणांची प्रश्नावली असणार आहे , एकूण १००० गुणांपैकी प्राप्त होणाऱ्या गुणांच्या आधारे देशातील व महाराष्ट्रातील सर्वात स्वच्छ सुंदर गाव व ग्रामपंचायत या मोहिमेदरम्यान घोषित होणार आहे. ही तपासणी त्रयस्थ संस्थेमार्फत असल्याने गावातील सुविधांचा वापर तसेच बदललेल्या मानसिकतेबाबत कुटुंबांच्या भेटी शिवाय हा उपक्रम कायमस्वरूपी ठेवण्यासाठी गाव पातळीवर झालेली उपायोजना ग्रामस्थांचा सहभाग इत्यादी बाबी प्रामुख्याने पाहणी होणार आहे.



गाव भेटी दरम्यान प्रत्यक्ष निरीक्षण करताना स्वच्छता सुविधांचे निरीक्षण, ग्रामस्थांचा सहभाग जनजागृती दृश्यमान स्वच्छता इत्यादी बाबत पाहणी होणार आहे. कुटुंबाची गृहभेट होत असताना घरातील स्वच्छतेच्या सुविधांची स्थिती वैयक्तिक शौचालयाचा वापर हात धुण्याच्या सवयी तसेच कुजनारा व नकुजणाऱ्या कचऱ्याचे वर्गीकरण व त्याकरिता असलेली सुविधा शिवाय सांडपाणी व्यवस्थापनाचे केलेले काम इत्यादी बाबत गुणांकन होणार आहे, गाव भेटी दरम्यान रस्त्यावर कुठेही सांडपाणी व घनकचरा पडलेला नाही शिवाय प्लास्टिक व्यवस्थापन हे कचरा वर्गीकरण केंद्रात केलेले आहे निर्माण झालेल्या खतखड्यांमधून खत निर्मिती बाबत ने नियोजन केले आहे शिवाय सांडपाणी व्यवस्थापनाचे काम अतिशय सुरेख झालेले आहे सार्वजनिक ठिकाणी ही स्वच्छ व नीटनेटकी केलेली आहेत इत्यादी बाबत ही पाहणी होणार आहे. सार्वजनिक ठिकाणे उदाहरणार्थ धार्मिक स्थळे, शाळा अंगणवाडी परिसर, बाजार तळ या ठिकाणी उघड्यावरती कचरा पडलेला नाही तसेच सार्वजनिक शौचालयाची सुविधा नीटनेटकी आहे वापर सुरू आहे कचरा वर्गीकरणासाठी वर्गीकरण केंद्र आहे आणि हा परिसर स्वच्छ असून महिलागार व्यवस्थापनाबाबत सुविधा गावात आहे अशा प्रकारची पाहणी व गुणांकन होणार आहे. प्लास्टिक संकलन व प्रक्रिया केंद्र तसेच गोवर्धन व महिला गाळ व्यवस्थापन इत्यादीचे पाहणी दरम्यान गुणांकन होणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाची सुविधा ही आगामी भविष्यकाळात बचत गटांना किंवा इतर व्यवस्थेमार्फत कायमस्वरूपी चालविण्याबाबत सुरू ठेवण्याबाबत ग्रामपंचायतीने शाश्वत उपायोजना केलेली असल्यास त्याचेही गुणांकन यात होणार असल्याने सर्व ग्रामपंचायतींच्या सरपंच ग्रामपंचायत अधिकारी तसेच ग्राम पाणीपुरवठा समितीच्या सदस्यांनी काळजी घ्यावी असे आवाहन देखील मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

# राडी येथे फळबाग लागवडची अप्पर जिल्हाधिकारी यांच्याकडून पाहणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

कृषी विभागाकडून रोजगार हमी योजने अंतर्गत सन २०२४/२५ मध्ये मौजे राडी या एकाच गावात ४० शेतकऱ्यांनी २९ हेक्टर वर फक्त केळी या फळपिकाची लागवड केली असून त्यात सर्व शेतकऱ्यांनी आंतरपीक म्हणून रब्बी हंगामामध्ये गहू व मिरची असा यशस्वी प्रयोग करून आपली आर्थिक उलाढाल वाढवून पारंपरिक पद्धतीने शेती आणि आणि ऊस पिकाला पर्याय म्हणून केळी हे प्रगतीच्या दिशेने प्रवास करत आहे.या यशस्वी प्रयोगशील शेतकऱ्यांच्या शेतावर अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणेजिरंगे यांनी उमेश गंगने यांच्या शेतावर भेट देऊन पाहणी केली केळी लागवडीच्या सर्व शेतकऱ्यांना आंतरपीक बाबत विचारपूस केली व त्यांच्याकडून



रोजगार हमी योजना ही भविष्यात शेतकऱ्यांच्या आर्थिक फायद्यासोबत जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्यास मदत होईल असे बोलल्या.छतपत्री संभाजी नगर विभागात राडी गावातील शेतकऱ्यांनी २९ हेक्टर वर योजनेतून फळबाग लागवड करून आपले गाव विभागात द्वितीय क्रमांक पटकावला याचे सर्व श्रेय कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचे आहे त्याशिवाय हे शक्य होत नाही म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी सहाय्यक कृषी अधिकारी किशोर प्रभाकर अडगळे यांचा सत्कार ही केला.यावेळी सरपंच प्रशांत बप्पा पाटील माजी सरपंच सतीश गंगने केळी लागवड शेतकरी ग्रामपंचायत व शालेय व्यवस्थापन समिती आजी माजी पदाधिकारी,मंडळ अधिकारी श्रीमती चव्हाण, ग्रामविकास अधिकारी श्री देशमाने,ग्राम महसूल अधिकारी उखळे उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी विद्यालयात योग वर्गाचे आयोजन



माजलगाव । प्रतिनिधी

येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात जागतिक योग दिनानिमित्त दि २१ जुन शनिवार रोजी योग वर्गाचे आयोजन करण्यात आले.या योग वर्गाला योगप्रशिक्षक प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर व प्रा.सुरेशचंद्र नेळगे यांनी मार्गदर्शन केले.

सुरुवातीला प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी योगासनांचा इतिहास सांगून त्याचे महत्त्व विशद केले. त्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांकडून योगासनांची प्रात्यक्षिके करून घेतली.तसेच ध्यान, प्राणायाम देखील विद्यार्थ्यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक मनोज सोळंके, भास्कर पारगावकर, बालासाहेब झोडगे, आप्पासाहेब होके, विष्णू गडकर, माधव घोलप, मुरलीधर भाळशंकर,अनंत शेजुळ,अनंत राठोड,दत्तात्रय इंगळे,सय्यद गयास,मिलिंद देशपांडे,सत्यप्रिया होके

◀◀ पान २ वर

# अंबाजोगाईत चतुरवाडी परिसरात कुलूप कोंडा तोडून धाडसी चोरी

## सोन्या, चांदीचे दागिने व रोख रक्कम असा आठ लाख रुपयांचा ऐवज चोरीस

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

कुटुंबातील सर्वजण झोपेत असताना अज्ञात चोरट्यांनी घरात घुसून सोन्या चांदीचे दागिने,रोख रक्कम व घरातील मौल्यवान वस्तू असा ८ लाख ५ हजार ७५० रुपयांचा ऐवज चोरून नेला. ही धाडसी चोरी बुधवारी रात्री नंतर झाली.

चतुरवाडी परिसरातील निवृत्तीनगर परिसरात व्यापारी किरण बंडु चव्हाण आपल्या तीन भावांसह कुटुंबीय राहतात. कांहीं दिवसापूर्वी त्यांच्या या घराची वास्तुशांती झाली. याप्रसंगी त्यांना आलेल्या भेटवस्तु व घरातील सोन्या चांदीचे दागिने, सोलार पॅनल व रोख रक्कम त्यांनी एका स्वतंत्र रूम मध्ये ठेवली. व या रुमला कुलूप लाऊन सर्व कुटुंबीय रात्री झोपी गेले. मध्यरात्रीनंतर अज्ञात

चोरट्यांनी घरात प्रवेश केला. ऐवज असलेल्या त्या बंद रूमचा कोंडा व कुलूप तोडून रूम मध्ये प्रवेश केला. येथील कपाटात असलेली रोख रक्कम ५० हजार रुपये, सोन्याची बोरमाळ, एक सोन्याचे गंठण, एक सोन्याचा झुंबर जोड, एक सोन्याचा सेवन पिस हार,

पाच सोन्याच्या अंगठ्या, सोन्याची चैन एक तोळा, सोन्याचे मनी, सोन्याची काडी,दोन चांदीचे गणपती, पायातील चांदीचा जोड, करंडे, पंचपाळे, सोलार पॅनल, नवीन साड्या असा एकूण आठ लाख रुपयांपेक्षा ज्यात किमतीचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला. कुटुंबातील महिला सकाळी उठून झाडलोट करत असताना ऐवज ठेवलेल्या रूमचा दरवाजा उघडा दिसला. यानंतर घरातील सर्वजण जमा झाले. यावेळी त्यांना चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. या प्रकरणी व्यापारी किरण बंडु चव्हाण यांच्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्याविरुद्ध ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे. पोलिस या चोरीचा तपास करीत आहेत.

# टाळ मृदुंग गजराच्या भक्तिमय वातावरणात

## श्री गजानन महाराजांच्या पालखीचे आंबनगरीत आगमन

### संकेत मोदी, तहसीलदार विलास तरंगे यांनी केले पालखीचे स्वागत

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शेगाव निवासी संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज यांच्या पालखीचे सलग ५६ व्या वर्षी अंबाजोगाई शहरात टाळ मृदुंगाच्या गजरात मोठ्या भक्तिमय वातावरणात आगमन झाले. शहरातील संत भगवानबाबा चौकात संकेत राजकिशोर मोदी यांनी संत श्री गजानन महाराज यांच्या पालखीस पुष्पहार अर्पण करून व महाराजांच्या मूर्तीस पुष्पअर्पण करून स्वागत केले. पालखीच्या स्वागतासाठी रस्त्यावर शहरातील महिलांच्या वतीने रांगोळी काढून संपूर्ण शहर हे गजाननमय झाले होते.



२ जून २०२५ रोजी आषाढी वारीसाठी संत श्री गजानन महाराजांच्या पालखीचे शेगाव येथुन प्रस्थान होऊन ४ जुन २०२५ रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे आगमन होणार आहे. दोन दिवसांच्या परळी येथील मुक्कामानंतर पालखीचे आज दुपारी एक वाजता अंबाजोगाई शहरात आगमन झाले. टाळ मृदंगाच्या तालावर शेकडो वारकऱ्यांनी ज्ञानेश्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकारामांच्या गजराचा ठेका धरला. पंढरीनाथ महाराज की जय, विठ्ठल विठ्ठल श्रीहरी विठ्ठल, संत गजानन महाराज की जय, गण गण गणात बोते या जयघोषाने एकापाठोपाठ सुंदर अश्या चालीवर भजन करत या वारकऱ्यांनी अंबाजोगाई शहर अक्षरशः दणाणून सोडले होते. पूर्वी या पालखी सोहळ्यामध्ये हत्ती घोडे असा लवाजमा असायचा परंतु गेल्या काही वर्षापासून सुरक्षेच्या कारणास्तव केवळ दोन अश्व आणि पुरुष वारकरीच सहभागी केले जात आहेत. यावर्षी प्रथमच शासनाच्या वतीने महसूल प्रशासनाकडून देखील तहसीलदार विलास तरंगे यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून स्वागत केले. यावेळी तहसीलदार यांच्यासह महसूल विभागातील त्यांचे सहकारी देखील पालखीच्या स्वागतासाठी उपस्थित होते. पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी देखील

◀◀ पान २ वर

# निरोगी मन व शरीरासाठी योगासन व आहाराचे नियोजन आवश्यक –डॉ.गजानन रुद्रवार

माजलगाव । प्रतिनिधी

निरोगी मन व शरीरासाठी योगासन व आहाराचे योग्य नियोजन आवश्यक असल्याचे प्रतिपादन माजलगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ गजानन रुद्रवार यांनी केले. येथील श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात क्रीडा व योग विभागाच्या वतीने आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड,तसेच मंचावर केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी,संयोजक डॉ. उमेश साडेगावकर उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की,योग्य व सात्विक आहार तर आपल्या निरोगी शरीरासाठी आवश्यक आहेच परंतु त्यासोबतच योग, प्राणायाम, ध्यानधारणा देखील आपल्या शरीरासाठी तितकीच आवश्यक




आहे. म्हणून आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वैश्विक स्तरावर योगाला महत्त्व प्राप्त करून दिले आहे. म्हणून फक्त योग दिवसाच्या निमित्तानेच नाही तर दररोज प्रत्येकाने योगासने व प्राणायाम आपल्या शरीराच्या तंदुरुस्तीसाठी केले पाहिजे.आपण याचे महत्त्व जाणले आहे. ज्या व्यक्तीची प्रतिकारशक्ती चांगली असते त्याच्या शरीरामध्ये कोणताही आजार प्रवेश करत नाही आणि आपली प्रतिकार शक्ती जर वाढवायची असेल तर योगा व प्राणायाम हा नियमित केला पाहिजे असे ते म्हणाले.याप्रसंगी शुभेच्छापर मनोगत व्यक्त करताना केंद्रीय कार्यकारणी सदस्य अमरनाथ खुर्पे म्हणाले की, महर्षी पतंजली यांनी पाच हजार वर्षांपूर्वी योग व प्राणायामाचा जो परिपाठ घालून दिला आहे तो आपली संस्था आपल्या संस्थेतील कर्मचाऱ्यांच्या आरोग्यासाठी नित्यनियमाने पार पाडत आहे.नित्य नियमित योगा व प्राणायाम केल्याने आपले मन मेंदू आणि मनगट बळकट होते व आपल्या शरीरामध्ये कोणताही

◀◀ पान २ वर

# आमचा महसूल चालतो मग आम्हाला रस्ता का नाही ? आझाद क्रांती सेनेचा सरकारला सवाल



माजलगांव (प्रतिनिधी) खामगांव पंढरपूर महामार्गाजवळ जायकोचीवाडी फाटा येथे दि.२१ जून २५ शनिवार रोजी सकाळी १०:०० वाजता आझाद क्रांती सेनेच्या वतिने न्याय मागण्या साठी भव्य रस्तारोको करण्यात आला.

आम्हाला प्यायला स्वच्छ पाणी का नाही ?आमच्या गावच्या शाळेला दर्जेदार शिक्षण का नाही ? शेतकऱ्यांना कर्जमाफी का नाही.गेली ३५ वर्षापासून जायकोचीवाडीचा रस्ता अद्यापपर्यंत झालेला नाही शाळेतील विद्यार्थी, अबलावृद्ध, गर्भवती महिला, यांच्यासह गावकऱ्यांना दळणवळणासाठी रस्ता नसल्यामूळे नागरिकांमध्ये चिड निर्माण झाली असून रस्त्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.रस्त्याचे काम तात्काळ सुरू न केल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलन आझाद क्रांती सेनेच्या वतीने करण्यात येईल असा इशारा याप्रसंगी देण्यात आला या आंदोलनामध्ये आझाद क्रांती सेना प्रमूख राजेश घोडे,ता.प्रमूख अशोक ढगे,किसन भिसे,उद्धव वाकणकर,अकाश हतागळे,राहूल गायकवाड,संजय हिवाळे,अरूण पिसूळे,भारत गायकवाड,गणेश कांबळे,पांडुरंग कांबळे,अशोक गायकवाड,सुनील कांबळे,सुनील खंडागळे,सुरेश घोडे,बप्पा सुरवसे, दादाराव थोरात व समस्त गावकरी महिला यांची लक्षणीय उपस्थीती होते.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्या प्रकरणी आरोपीस २० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

बीड । प्रतिनिधी

दिनांक २५/०८/२०२० आणि दि. २८/०८/२०२० रोजी पिडीत अल्पवयीन मुलीवर बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी (रा. पाली ता.जि. बीड ) यास मा. एस. आर शिंदे मॅडम अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश – २ तथा विशेष न्यायाधिश बीड यांनी दोषी ठरवून २० वर्ष सश्रम कारावास व १० हजार रुपये दंड व दंड न भरल्यास १ वर्षाचा सश्रम कारावास एवढया दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

फिर्यादी हि तिच्या आईसोबत मामाच्या गावी खंडोबाच्या यात्रेसाठी गेली असता तेथे तिची ओळख आरोपी सोबत झाली. तेव्हा त्याने फिर्यादीचा मोबाईल नंबर घेतला व दोघे व्हाटसअप,



इस्टाग्राम वरून व फोन करून बोलू लागले त्यामुळे त्यांची चांगली ओळख झाली होवून मैत्री झाली त्यानंतर मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. दि. २५/०८/२०२० रोजी फिर्यादीची आई आणि आजी महालक्ष्मी सनानिमित्त गावी गेले होते तेव्हा फिर्यादी हि घरात एकटीच असताना अरोपी तेथे आला व तु आता

◀◀ पान २ वर

# आष्टी पंचायत समितीत शेळी पालन पत्र्याचे शेड, शेततलाव, विहीर प्रस्ताव मंजूरी देण्यासाठी

## शेतकऱ्यांची कनिष्ठ लिपिका कडून मोठ्या प्रमाणात आर्थिक लुट? संबंधित कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी

### आझाद क्रांती सेनेच्या वतीने गटविकास अधिकारी व जिल्हा परिषद सिओ यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी पंचायत समितीमध्ये रोजगार हमी योजने अंतर्गत शेळी पालन पत्र्याचे शेड, शेततलाव, विहीर, गायगोठा या प्रस्ताव प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी शेतकऱ्यांकडून मुख्य सुत्रधार कनिष्ठ लिपिकच सर्व प्रस्ताव करून स्वतः गटविकास अधिकारी आहे असा वागत मोठ्या प्रमाणात अर्थिक लुट करत असून अशा भ्रष्ट कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करून बदली करावी अशी मागणी आझाद क्रांती सेनेचे तालुकाध्यक्ष संदीप वाल्हेकर यांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

आष्टी पंचायत समिती कार्यालयात सध्या रोजगार हमी



योजने अंतर्गत शेळी पालन पत्र्याचे शेड योजना, शेततलाव, विहीर, गायगोठा या प्रस्ताव प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी टी.एस. करण्यापासून ते प्रशासकीय मंजूरी पर्यंत संबंधित अधिकारी, कर्मचारी सर्वसामान्य, गोरगरीब शेतकरी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पंचायत समिती कार्यालयात येत असून त्यांची अर्थिक लुट कनिष्ठ सहाय्यक मोठ्या प्रमाणावर करत असून इतर संबंधित अधिकारी यात सहभागी असून अशा संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्याची तात्काळ चौकशी करून योग्य ती कारवाई

◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पालखी दर्शनात गर्दीचा फायदा घेत सोनसाखळी चोरी; पुण्यातील धक्कादायक प्रकार

**पुणे । प्रतिनिधी**

आषाढी वारी सोहळ्याला सुरुवात झाली असून संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्या पुण्यामध्ये विसावल्या आहेत. उद्या (दि.२२) दोन्ही पालख्या पंढरपूरच्या दिशेने पुढील प्रवासाला निघणार आहेत. शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये आषाढी वारी पालखीमुळे मोठी ग्रदी झाली होती. लाखो वारकरी आणि भाविकांच्या उत्साहामध्ये पुणेकरांनी पालख्यांचे जोरदार स्वागत केले. यामध्ये मात्र चोरट्यांनी देखील हात साफ केले असल्याचे दिसून आले आहे.

पुण्यामधील संगमवाडी येथे संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीची भेट होत असते. संत तुकाराम महाराज यांची देहूमधून तर संत ज्ञानेश्वर महाराज यांची आळंदीहून पालखी पंढरपूरच्या दिशेने निघते. दोन्ही पालखी सोहळ्यामध्ये हजारो दिंड्या आणि लाखो वारकरी सहभागी होत असतात. यामध्ये अनेक माय माऊली देखील सहभागी होतात. तसेच पालखी पाहण्यासाठी देखील महिलांची मोठी गर्दी होत असते. याचा गैरफायदा चोरट्यांनी घेतला असल्याचे दिसून आले आहे.





पालखी सोहळ्यासाठी बोपोडी चौक व खडकी रेल्वे स्टेशन परिसरात चोरीची घटना घडली आहे. पालखी सोहळ्यासाठी जमलेल्या गर्दीचा गैरफायदा घेत चोरट्यांनी ज्येष्ठ महिलेसह दोघींकडील सोन्याचे मंगळसूत्र चोरी केल्याची घटना घडली. याप्रकरणी खडकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत जूनी सांगवी येथील ६८ वर्षीय महिलेने तक्रार देखील दाखल केली आहे. शुक्रवारी (दि.२०) दुपारी बोपोडी चौक व खडकी भागात या मंगळसूत्र चोरीच्या घटना घडल्या आहेत. तक्रारदार महिला या संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी बोपोडी भागात आल्या होत्या. दुपारी सुमारे एकच्या सुमारास मोठी गर्दी होती. हा गैरफायदा घेत चोरट्याने त्यांच्या गळ्यातील आणि त्यांच्या सोबत असलेल्या दुसर्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र लांबविले. मंगळसूत्र चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी खडकी पोलिसांत धाव घेतली.

तक्रारदार महिलेच्या तक्रारीनंतर आता खडकी पोलीस चोरट्यांचा शोध घेत आहेत. दरम्यान, दरवर्षी पालख्यांच्या गर्दीमध्ये चोरटे सक्रीय होतात. महिलांकडील मंगळसूत्र चोरीच्या घटना घडतात. त्याला आळा घालण्यासाठी गर्दीच्या ठिकाणी पोलिसांकडून साध्या वेशात पोलिसांची नियुक्ती केली जाते. मात्र, तरीही चोरीच्या घटना घडत आहेत. आता देखील तीन महिलांच्या मंगळसूत्राची चोरी झाली आहे.

# मोशीतील प्रस्तावित कत्तलखाना आरक्षण अखेर रद्द; फडणवीस यांची मोठी घोषणा

**पुणे । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका सुधारित विकास आराखड्यामध्ये प्रस्तावित केलेला मोशी व तीर्थक्षेत्र आळंदीच्या परिसरातील कत्तलखान्याचे आरक्षण रद्द करण्यात येईल. वारकरी, भूमिपुत्र आणि शेतकऱ्यांच्या श्रद्धेच्या बाबतीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, अशी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा आषाढी वारी पायी पालखी सोहळा पुण्यात दाखल झाला आहे. या ठिकाणी मुख्यमंत्री फडणवीस यांनी पालखीचे दर्शन घेतले आणि वारकऱ्यांशी संवाद साधला. दोन दिवसांपूर्वी, पिंपरी-चिंचवडमध्ये विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात मोशी येथील प्रस्तावित कत्तलखाना आरक्षण रद्द करण्याबाबत ग्रामस्थ आणि भूमिपुत्रांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले होतो.

तसेच, भाजपा आमदार महेश लांडगे यांनीही महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली होती. मोशी, चऱ्होलीच्या नागरिकांची निवेदने स्वीकारा आणि त्यावर सकारात्मक निर्णय घ्या, असे साकडे आमदार लांडगे यांनी घातले होते. त्याला अखेर यश मिळाले आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीमध्ये आळंदी शहरा जवळ कत्तलखाण्याचे आरक्षण विकास आराखड्यामध्ये टाकण्यात आले आहे. त्यामुळे श्रीक्षेत्र आळंदी सारख्या देवस्थानाच्या परिसरामध्ये अशा पद्धतीने कत्तलखाण्याचे आरक्षण टाकण्यात आल्याने त्याबाबत सर्व स्तरातून नाराज व्यक्त झाली. प्रशासनाने सदर आरक्षण हटवावे, यासाठी आमदार लांडगे यांनी पाठपुरावा सुरू केला.

पुण्यामध्ये माध्यमांशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, जो काही विकास आराखडा आहे. त्या विकास आराखड्यामध्ये मोशी-आळंदी येथे कत्तलखाण्याचे आरक्षण दाखवण्यात आले आहे. मात्र कुठल्याही परिस्थितीमध्ये कत्तलखाना होऊ दिला जाणार नाही. त्याबाबतच्या आरक्षण वगळण्याच्या आदेश मी दिले आहेत. वारकऱ्यांना आणि वारकरी नेत्यांना सांगू इच्छितो कोणत्याही परिस्थितीत कत्तलखाना होणार नाही.

# सुपरवायझरने परस्पर बनावट बँक खाती उघडून मालकाला घातला ४२ लाखांना गंडा

**पुणे । प्रतिनिधी**


मिलेटरी इंजिनिअर सर्व्हिस यांनी कंपनी काळ्या यादीत टाकल्याने बेरोजगार होऊन कर्जबाजारी झाल्याचे सांगितल्याने त्यांनी त्याला सुपरवायझर म्हणून नोकरी दिली. त्याचा गैरफायदा घेत त्याने लष्कराच्या गॅरिसन इंजिनिअरींग च्या कामाचे फायनल बिलाचे चेक बनावट खाते उघडून त्यात भरुन ४२ लाख ४६ हजार ८१५ रुपयांची फसवणूक केली.

याबाबत संदीपसिंग पुरणसिंग अमरसिंग (वय ४०, रा. विमाननगर) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी प्रतिक बेरा (वय ४५, रा. खेरे पार्क, लोहगाव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार लोहगाव येथील गॅरीसन इंजिनियरिंग कार्यालयात १३ ऑक्टोंबर २०२३ ते २० जानेवारी २०२४ दरम्यान घडला. पोलिसांत दाखल झालेल्या तक्रारीनुसार फिर्यादी संदिप सिंग व त्यांचे वडिल पुरणसिंग यांची संदीप इंटरप्रायजेस नावाची फर्म आहे. त्यांना मिलटरी इंजिनिअरगिं सर्व्हिसमध्ये बांधकामाचे १ कोटी ४९ लाख आणि ५५ लाख ८४ हजार रुपयांचे अशी दोन टेंडर मिळाली होती. त्यांच्या परिचयाचे मनिष राज मलिक यांच्या ओळखीचा प्रतिक बेरा याने त्यांच्याशी संपर्क साधला. माझी कंपनी पी व्ही कन्स्ट्रक्शन ही मिलेटरी इंजिनिअर सर्व्हिस यांनी बॅन केलेली आहे. मी कर्जबाजारी झालो असून घरसुद्धा बँकेच्या ताब्यात गहाण ठेवलेले आहे. तुम्हाला एअर फोर्सचे जे काम मिळाले आहे. त्यात मी सुपरवायझिंगचे काम करतो, असे तो म्हणाला. त्याच्यावर दया येऊन त्यांनी सुपरवायझर म्हणून त्याला कामावर ठेवले. त्याला कोणतेही आर्थिक व्यवहाराचे काम दिले नव्हते. काम जसे पूर्ण होत होते, तसे पेमेंट मिळत होते. त्यानंतर त्याच्याविरुद्ध एका बांधकाम व्यावसायिकाने तक्रार केली. याबाबत गॅरीसन इंजिनिअरींग कडून चौकशी झाली. त्यांच्या कामाची तपासणी होऊन ती सर्व बरोबर असल्याचे दिसून आले. त्यानंतर त्यांचे फायनल पेमेंट येणे असताना काकीचे निधन झाल्याने ते वडिलांना घेऊन पंजाबमध्ये गावी गेले होते. त्यांनी फायनल बिलाच्या तपासणीच्या वेळी सर्व कागदपत्रांची पुर्तता करावी लागेल, म्हणून त्यांनी कागदपत्रे प्रतिक बेरा याच्याकडे दिली होती. फायनल पेमेंट येण्यास उशीर होणार असल्याचे बेरा याने सांगितले. त्यानंतर त्यांच्या सी ए ने फोन करुन सांगितले, फायनल पेमेंट आले आहे, त्यावरती जीएसटी भरावयाचा आहे. त्यानंतर त्यांनी चौकशी केल्यावर प्रतिक बेरा याने कंपनीच्या लेटरपॅडचा वापर करुन दोन बनावट मॅन्डेट फॉर्म तयार करुन त्यावर संदीप इंटरप्रायझेस या कंपनीच्या नावे खोटी कागदपत्रे तयार करुन त्यांच्या वडिलांची बनावट सही करुन, ट्रान्सफर करुन घेऊन त्यांच्या कामाच्या फायनल बिलाचे ४२ लाख ४६ हजार ८५१ रुपये दुसर्या बँक खात्यामध्ये ट्रान्सफर करुन घेऊन फसवणूक केली. याबाबत सहायक पोलीस निरीक्षक चंदन तपास करीत आहेत.

# लोणावळा शहराजवळील प्रसिद्ध 'कातळधार' धबधबा पर्यटकांसाठी प्रतिबंधित

**लोणावळा । प्रतिनिधी**

पर्यटक आणि ट्रेकर्स यांचे आकर्षण असलेला कातळधार धबधबा सुरक्षेच्या कारणास्तव पर्यटकांसाठी प्रतिबंधित करण्यात आला असून वनखात्याने त्यासंदर्भात आदेश पारित केले आहे.



लोणावळा शहराजवळील राजमाची किल्ल्याच्या मार्गावर असलेल्या कातळधार धबधब्याला पर्यटक मोठ्या संख्येने भेट देतात. मात्र या धबधब्याकडे जाणारी पायवाट निसरडी आणि प्रचंड धोकादायक झालेली असल्याने तसेच या मार्गावर अनेक ठिकाणी दरडी सैल झाल्या असल्याने राजमाची ग्रामस्थांनी हा धबधबा पर्यटकांसाठी बंद करावा, अशी मागणी पोलीस आणि वन खात्याकडे केली होती. त्याअनुषंगाने कातळधार धबधब्याकडे जाण्यास प्रतिबंध करण्यात आला असून तसे फलक वनखात्याकडून जागोजागी लावण्यात आले आहे. याशिवाय राजमाची किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर ऑफरोडिंग करणाऱ्या वाहनांना देखील बंदी घालण्यात आल्याची माहिती वनपरिमंडळ अधिकारी सागर चुटके यांनी दिली.

धबधब्याचा पाण्यात भिजण्याची मजा लुटण्यासाठी राजमाची कडे येणाऱ्या पर्यटकांचा हिरमोड होऊ नये यासाठी या मार्गावर फणसराई भागात असलेले ५ ते ६ धबधबे मात्र पर्यटकांसाठी खुले ठेवण्यात आले असून त्याठिकाणी सुरक्षित पर्यटनाचा आनंद पर्यटकांनी घ्यावा, असे आवाहन वनखात्याकडून करण्यात आले आहे. खरंतर एखादी दुर्घटना घडल्यावर प्रशासनाला जबाबदार धरले जाते. मात्र प्रशासनाने दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करून पर्यटक अतिउत्साहीपणा दाखवतात आणि त्यानंतर कुंडमळ्या सारख्या एखाद्या दुर्घटनेचे बळी ठरतात.

त्यामुळे प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करीत सुरक्षित पर्यटन करणे, ही सर्व पर्यटकांची जबाबदारी आहे. व्यवसायापेक्षा पर्यटकांची सुरक्षितता अधिक महत्त्वाची असल्याच्या भावनेने राजमाची ग्रामस्थांनी केलेल्या मागणीवर पोलीस प्रशासन आणि वनखात्याकडून सकारात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

# वारीत नक्षलवादाचे आरोप असलेले लोक; सरकारने कबीर कला मंचला रोखलं पाहिजे, अन्यथा...; ह. भ. प. बंडातात्या कराडकर

**पुणे । प्रतिनिधी**

वारीत नक्षलवादाचे आरोप असलेले लोक पाहायला मिळत आहेत. ते बुद्धिभेद करत आहेत. सरकारने लवकर यांच्यावर कारवाई करावी, अन्यथा वारकरी संप्रदायातील युवक जाब विचारतील. त्यासाठी आम्ही युवक गट तयार केला आहे. त्यावेळी सरकार जबाबदार राहील, असा इशारा ह. भ. प. बंडातात्या कराडकर यांनी दिला आहे. समस्त वारकरी संस्था आणि संस्थान यांच्यावतीने शनिवारी (दि.२१ जून) घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.



कबीर कला मंच यांना सरकारने रोखले पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली आहे. वारीत अंधश्रद्धा निर्मूलन समिती काय काम करत आहे? असा सवालही त्यांनी केला.काही पुरोगामी संघटना पालखी सोहळ्यात येतात आणि अपप्रचार करतात. संताचे दाखले अर्धवट दिले जात आहे. त्यामुळे वारकरी संप्रदायाला बदनाम करण्याचे काम सुरु आहे. वारकरी संप्रदाय सगळ्यात मोठा आहे. त्यांची संघशक्ती मोठी आहे. वाघाचे कातडी पाखरून वाघ होता येत नाही. पण असेच काहीजण काम करत आहेत. काहीजण वारकरी गर्दीचा फायदा घेऊन आपले खोट नाणे चालवत आहेत. वारकरी मुळावर घाला घालीत आहेत. आम्ही कुणाचा द्वेष करत नाहीत. पण मुळावर घाव घालत असाल तर हे लोकांना सांगितले पाहिजे, असे बंडातात्या कराडकर यांनी म्हटले आहे.

'पंढरपूरला जाईपर्यंत आमच्या मागण्या मान्य करा'

मोशीत कत्तलखाना होणार नाही, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. पण त्याची लेखी सूचना निघाली पाहिजे. आमची सरकारला मागणी आहे की, आम्ही पंढरपूरला जाईपर्यंत आमच्या मागण्या मान्य करून लेखी सूचना द्याव्यात. अन्यथा वारकरी संप्रदायाच्या भावना तीव्र झाल्यास आंदोलन होईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

# 'दगडूशेठ' गणपती ट्रस्टचा पुढाकार! ११,७६४ वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी

**पुणे । प्रतिनिधी**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळ यांच्या वतीने पुण्यात आलेल्या वारकऱ्यांसाठी जय गणेश रुग्णसेवा अभियान अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात तब्बल ११,७६४ वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. बुधवार पेठेतील जय गणेश प्रांगण येथे झालेल्या या शिबिराचे उद्घाटन ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, आमदार व सरचिटणीस हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी यांच्यासह इतर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत झाले.



रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा या ब्रीदवाक्यानुसार आयोजित शिबिरात वारकऱ्यांच्या डोळ्यांची तपासणी, चष्मे वाटप, अंगदुखी, डोकेदुखी, बीपी, शुगर यांसारख्या आजारांची तपासणी आणि मोफत औषध वितरण करण्यात आले याशिवाय, फिजिओथेरपी सेवाही उपलब्ध करून देण्यात आली. शिबिरात २५ रुग्णालयांतील ३७५ डॉक्टर आणि अनेक स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. सकाळी १५ हजार वारकऱ्यांना चहा, नाश्ता आणि पाणी वितरित करण्यात आले, तर पालख्यांच्या आगमनावेळी मंदिरासमोर पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. या शिबिरात प्रवासादरम्यान वारकऱ्यांना येणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांवर उपचार करण्यात आले. ट्रस्टच्या या सामाजिक उपक्रमाचे वारकऱ्यांनी आणि स्थानिकांनी कौतुक केले आहे.

# मैत्रिणीसमवेत कारमध्ये गप्पा मारणाऱ्या तरुणाकडून पैसे उकळणाऱ्या दोन पोलिस कर्मचाऱ्यांचे निलंबन

**पुणे । प्रतिनिधी**

मैत्रिणीसमवेत कारमध्ये गप्पा मारणाऱ्या तरुणास धमकावून त्याच्याकडून २० हजार रुपये उकळणाऱ्या दोन पोलिस कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आले आहे. परिमंडळ एकचे प्रभारी पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे यांनी याबाबतचा आदेश दिला आहे. ही घटना मंगळवारी (ता.१७) रात्री विधी महाविद्यालय परिसरात घडली होती.




गणेश तात्यासाहेब देसाई, योगेश नारायण सुतार अशी निलंबन केलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांची नावे आहेत. याप्रकरणी एका तरुणाने डेक्कन पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. विधी महाविद्यालय रस्त्यावरील दामले पथ परिसरात मंगळवारी रात्रीच्या सुमारास तरुण त्याच्या मैत्रिणीसमवेत कारमध्ये गप्पा मारत बसले होते.

त्यावेळी पोलीस कर्मचारी गणेश देसाई व योगेश सुतार हे रात्रगस्तीवर होते. ते दोघेही तेथे आले. त्यांनी तक्रारदारास तुमच्याबद्दल तक्रार आली आहे, पोलिस ठाण्यात प्रकरण न्यायचे नसेल तर २० हजार रुपये दे, अशी मागणी केली. तरुणास दुचाकीवर बसवून कमला नेहरू पार्क परिसरातील एटीएममध्ये नेले. तेथे त्याच्याकडून २० हजार रुपये काढून घेतले. या घटनेमुळे घाबरलेल्या तरुण व त्याच्या मैत्रिणीने डेक्कन पोलिस ठाणे गाठले. त्यानंतर संबंधित पोलिसांची चौकशी करण्यात आली. डेक्कन पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीषा निंबाळकर यांनी दोघांबाबतचा कसुरी अहवाल पोलिस उपायुक्त पिंगळे यांच्याकडे पाठविला. घडलेल्या प्रकाराबाबत दोन्ही पोलिस कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांना माहिती देणे आवश्यक होते, तरीही त्यांनी तसे केले नाही. त्यांच्या वर्तनामुळे पोलिस दलाची प्रतिमा मलिन झाल्याचा ठपका ठेवून दोघांचे निलंबन केल्याचा आदेश पोलिस उपायुक्त पिंगळे यांनी दिले.

# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये योग दिन उत्साहात साजरा

**पिंपरी । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शहरातील सर्वच १३४ शाळांमध्ये योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शाळांमध्ये योगासने व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्यसाधून महापालिकेच्या शाळांमध्ये 'एक माता एक झाड' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक,योग प्रशिक्षक, शिक्षकेतर वर्ग, सुरक्षारक्षक, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

आयुष मंत्रालयाच्या 'योग संगम' कार्यक्रमामध्ये महापालिकेच्या सर्व शाळांनी सहभाग नोंदवला. सहभागी शाळांना ऑनलाइन स्वरुपामध्ये आयुष मंत्रालयाकडून 'योग संगम प्रमाणपत्र' प्राप्त झाले.

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने महापालिकेच्या सर्वच १३४ शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी योगासने करुन योग दिन साजरा केला. योग दिनाच्या निमित्ताने शाळेच्या प्रागंणामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये योगाबाबत रुची वाढविण्यासाठी योग दिनाचे महत्वाचे योगदान आहे.

_शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

आंतरराष्ट्रीय योग दिनाप्रमाणेच येत्या वर्षभर विविध उपक्रम राबविण्याचा महापालिकेचे नियोजन आहे. आजचा उपक्रम हा विद्यार्थ्यांना योगाचे महत्व समजून देऊन त्यांच्या दैंनदिन व्यवहारामध्ये योगाबाबत जागरुकता वाढविण्यासाठी उपयुक्त ठरेल.





_प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये योगाबाबत जागरुकता व योगाचे महत्व समजावे, यासाठी प्रत्येक शाळेमध्ये योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. योग दिनाच्या व्यतिरिक्तसुध्दा शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांना योग, योगासने याबाबत माहिती देण्याचा व त्यांना त्यामध्ये सहभागी करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जाणार आहेत._तानाजी नरळे, सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# चास येथील जवाहर विद्यालयात योगदिन साजरा

**पुणे । प्रतिनिधी**

चास, चास (ता. खेड) येथील रयत शिक्षण संस्थेच्या जवाहर विद्यालयात जागतिक योग दिन साजरा केला. यावेळी सर्व विद्यार्थ्यांसह शिक्षक सहभागी झाले होते.

जवाहर विद्यालयाचे मुख्याध्यापक यादव चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाच्या उपशिक्षिका कीर्ती गंभीर यांनी विद्यालयात जागतिक योग दिनाचे महत्त्व विशद करून योगाची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांसमोर सादर केली. यावेळी विद्यालयातील ४५० विद्यार्थी व १८ शिक्षक प्रात्यक्षिकात सहभागी झाले होते. यामध्ये प्रामुख्याने प्राणायाम, सुदर्शन क्रिया, योगा, मेडिटेशन, योगासने यांचा समावेश होता. योगाभ्यासाने रोगाशी लढण्याची शक्ती वाढते, शरीर निरोगी आणि मजबूत होते, स्नायूंना बळ मिळते, त्याचबरोबर तणाव दूर होतो. योग हा केवळ शारीरिक व्यायाम किंवा रोग बरी करण्याची कृती नसून जीवन सुधारण्याचा मार्ग आहे, असे मत विद्यालयाचे मुख्याध्यापक यादव चासकर यांनी व्यक्त केले. विद्यालयाचे पर्यवेक्षक किशोर जगताप, सुनीता घेवडे, महेश सुरवसे, राकेश ठोकळ, गीता बागल, आशा राऊत, राकेश ठोकळ, स्वाती टाकळकर, कपिल तिरपुडे, प्रतिमा कडलग, पूनम वाघ, कविता जोशी, दिनेश लाडके, कोकाटे उपस्थित होते. सोहम मुळूक व संचित मुळूक या दोन विद्यार्थ्यांनी मार्गदर्शनपर प्रात्यक्षिके सर्वांसमोर सादर केली. कीर्ती गंभीर यांनी प्रास्ताविक केले. महेंद्र जोशी यांनी आभार मानले.

